**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**

**नगरसचिव विभाग**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : १०**

नगरसचिव कार्यालय
दिनांक - १५/११/२०२२

प्रति,
मा. -------------------------------------
स्थायी समिती, सदस्य

अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची **सभा क्र.१० सोमवार दि.२१/११/२०२२ रोजी दुपारी १.०० वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृह कार्यालयात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

मा.अवर सचिव , महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील दिनांक १६मार्च २०२२ च्या पत्रान्वये कळविलेनुसार सदरची सभा सामाजीक अंतर राखून व आरोग्य विषयक निकशांचे काटेकोरपणे पालन करून प्रत्यक्ष उपस्थितीने सभा घेण्यास मान्याता देण्यात आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण प्रत्यक्ष उपस्थीतीने सहभागी व्हावे अशी विनंती आहे.

सही /-
(एस.बी.तडवी)
नगरसचिव
अहमदनगर महानगरपालिका

मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये

**सोमवार दिनांक - २१ / ११ /२०२२ ची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| १०८ | मा.स्थायी समिती सभा क्र.५ शुक्रवार दि.१५/०७/२०२२,मा.स्थायी समिती सभा क्र.६ मंगळवार दि.२६/०७/२०२२ व मा.स्थायी समिती सभा क्र.०७ दि.०५/०८/२०२२ रोजीच्या सभांचे इतिवृत्त कायम करणे बाबत. |
| १०९ | अहमदगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात विजतंत्री व पंपचालक यापदी संदिप प्रभाकर पुंड,मनिष कैलास सोनवणे व गहिनीनाथ अंबादास मेने यांची तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर कराराबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| ११० | अहमदगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी स्नेहल राजेंद्र मुळे व (मेकॅनिकल) यापदी राहुल सदाशिव गिते व प्रदिप सदाशिव ढगे यांची तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरिता करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |

| | |
|---|---|
| १११ | अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी विभागासाठी तात्पुरत्या स्वरूपात तांत्रिक पदावर अटी व शर्ती प्रमाणे नियुक्त्‍ी केलेल्या मानधन वरील करारबध्द नियुक्ती वरील मुदत संपत असलेल्या उमेदवारांच्या पुर्ननेमणूक करणे  बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ११२ | अहमदनगर महनगरपालिका कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका यापदी मोहीनी अशोक गुंजाळ (बेरड) यांची तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| ११३ | नुतन जिल्हाधिकारी कार्यालय,अहमदनगर,मार्गावर शहर बससेवा सुरू करणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ११४ | अर्जदार श्री.भाउसाहेब नामदेव कातोरे रा.नागापुर नागापुर उपविभाग,वॉर्ड क्र.७३ बिल क्र.१२६/१ मालमत्ता क्र.Z१७३३०३१२८७ सदर मिळकत अस्तीत्वात नसतांना आकारण्यात आलेली मालमत्ता कराची आकारणी रक्कम निर्लेखित करणे बाबत ऑफिस रिपोर्ट मंजुर. |
| ११५ | अहमदनगर महानगरपालिकेचे झेंडीगेट येथील शाळा क्रमांक ४ मधिल सामाजिक सभागृह जागा दरमहा रक्कम रूपये १९०००/- अटी व शर्ती प्रमाणे ५ वर्षे कराराने सायमा मुजाहिद कुरेशी अध्यक्ष प्रबोधन फौंडेशन अहमदनगर यांना भाडेतत्वावर देणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| ११६ | अहमदनगर महानगरपालिकेच्या फेर ई नि.क्र.८१९५६७ अहमदनगर महानगरपालिका सन २०२२-२३ करीता अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील गटर/ड्रेनेज/चेंबर दुरूस्ती कामाकरीता वार्षिक निविदा मंजुरी बाबत ऑफिस रिपोर्ट.(प्रभाग समिती क्र.१ करिता) |
| ११७ | अहमदनगर महानगरपालिकेच्या फेर ई नि.क्र.८१९६११अहमदनगर महानगरपालिका सन २०२२-२३ करीता अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील गटर/ड्रेनेज/चेंबर दुरूस्ती कामाकरीता वार्षिक निविदा मंजुरी बाबत ऑफिस रिपोर्ट.(प्रभाग समिती क्र.३ करिता) |
| ११८ | अहमदनगर महानगरपालिकेच्या फेर ई नि.क्र.८१९६२३ अहमदनगर महानगरपालिका सन २०२२-२३ करीता अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील गटर/ड्रेनेज/चेंबर दुरूस्ती कामाकरीता वार्षिक निविदा मंजुरी बाबत ऑफिस रिपोर्ट.(प्रभाग समिती क्र.४ करिता) |
| ११९ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.०७ मधील बोल्हेगांव भागातील गणेश चौक ते राघवेंद्र स्वामी मंदिर ते केशव कॉर्नर पर्यत रस्ता करणे "नविन रस्ता विकसित करणे सन २०२१-२०२२" अंतर्गत ई - निविदा क्रमांक ७८००९५ या निविदेच्या मंजुरीबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |

| | |
|---|---|
| १२० | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.१६ मधील भैरवनाथ पतसंस्था ते पाच गोडावून ते शाहूनगर बसस्टॉप पर्यत रस्ता करणे "नविन रस्ता विकसित करणे सन २०२१-२०२२" अंतर्गत ई - निविदा क्रमांक ७८००६२ या निविदेच्या मंजुरीबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| १२१ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीमधील प्रभाग समिती कार्यालय १ ते ४ करीता नालेसफाई व रस्ते सफाई कामी बाह्ययंत्रणेमार्फत कामगार/मजुर उपलब्ध करून घेणेकामी दर निश्चीतीनुसार खाजगी संस्थेची नेमणूक करणे कामी दराची जाहीर ई - निविदा सुचना क्र.०१ सन २०२२-२३ (T.ID२०२२ ANMC८०६४५१-१) मधील प्राप्त दरास प्रशासनाने केलेल्या मंजुर दरास व येणा-या खर्चास मान्यता मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| १२२ | अहमदनगर महानगरपालिका ढवणवस्ती परिसर,तपोवन हाडको,तपोवन परिसर,कसबे वस्ती परिसर ते नाना चौक पर्यत २०० एम.एम.व्यासाची HDPE पाईप लाईन टाकाणे कामाच्या दरास मंजुरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |

सही /-
(एस.बी.तडवी)
नगरसचिव
अहमदनगर महानगरपालिका

**सोबत** :-१) विषय क्रमांक- १०८ चे मा.स्थायी समिति सभा क्र.५ शुक्रवार दि.१५/०७/२०२२,मा.स्थायी समिती सभा क्र.६ मंगळवार दि.२६/०७/२०२२ व मा.स्थायी समिती सभा क्र.०७ दि.०५/०८/२०२२ राजीच्या सभांचे इतिवृत्त झेरॉक्स प्रती.
२) विषय क्रमांक- १०९ ते १२२ च्या प्रस्तावाच्या झेरॉक्स प्रती

**विषय क्रमांक : १०८** **दिनांक :- २१/११/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** मा.स्थायी समिती सभा क्र.५ शुक्रवार दि.१५/०७/२०२२,मा.स्थायी समिती सभा क्र.६ मंगळवार दि.२६/०७/२०२२ व मा.स्थायी समिती सभा क्र.०७ दि.०५/०८/२०२२ रोजीच्या सभांचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

**प्रस्तावाचा मजकुरः-** अहमदनगर महानगरपालिका नगरसचिव विभाग

मा.स्थायी समिती सभा क्र.५ शुक्रवार दि.१५/०७/२०२२,मा.स्थायी समिती सभा क्र.६ मंगळवार दि.२६/०७/२०२२ व मा.स्थायी समिती सभा क्र.०७ दि.०५/०८/२०२२ रोजीच्या सभांचे कार्यवृत्त कायम करणेसाठी मा.स्थायी समिती सभे पुढे ठेविले.

सबब कार्यवृत्त मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- मा.स्थायी समिती सभा क्र.५ शुक्रवार दि.१५/०७/२०२२,मा.स्थायी समिती सभा क्र.६ मंगळवार दि.२६/०७/२०२२ व मा.स्थायी समिती सभा क्र.०७ दि.०५/०८/२०२२ रोजीच्या सभांचे इतिवृत्त कायम करणे बाबत विषय आहे.

मा.श्री.रविंद्र बारस्कर :- इतिवृत्त वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये इतिवृत्ताचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.रविंद्र बारस्कर :- इतिवृत्त कायम करण्यात यावे.

मा.सौ.रिता भाकरे :- इतिवृत्त कायम करण्यात यावे.

मा.सभापती साहेब :- मा.स्थायी समिती सभा क्र.५ शुक्रवार दि.१५/०७/२०२२,मा.स्थायी समिती सभा क्र.६ मंगळवार दि.२६/०७/२०२२ व मा.स्थायी समिती सभा क्र.०७ दि.०५/०८/२०२२ रोजीच्या सभांचे इतिवृत्त कायम करण्यात येत आहे.

**ठराव :-** मा.स्थायी समिती सभा क्र.५ शुक्रवार दि.१५/०७/२०२२,मा.स्थायी समिती सभा क्र.६ मंगळवार दि.२६/०७/२०२२ व मा.स्थायी समिती सभा क्र.०७ दि.०५/०८/२०२२ राजीच्या सभांचे इतिवृत्त कायम करण्यात येत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.रविंद्र बारस्कर सही/-

अनुमोदक :- मा.सौ.रिता भाकरे सही/-

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## मा.स्थायी समिती सभा क्रमांक : १०

**विषय क्रमांक : १०९** **दिनांक :- २१/११/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात विजतंत्री व पंपचालक यापदी संदिप प्रभाकर पुंड,मनिष कैलास सोनवणे व गहिनीनाथ अंबादास मेने यांची तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर कराराबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुरः-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

**संदर्भ :-** पाणी पुरवठा विभाग यांचेकडील जा. क्र. ८५२ दि. १६ /०९/२०२२ अन्वयेचा प्रस्ताव

उपरोक्त विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की, पाणी पुरवठा विभाग यांनी त्यांचेकडील जा. क्र. ८५२ दि. १६/०९/२०२२ अन्वये प्रस्ताव सादर करुन त्यामध्ये " पाणी पुरवठा विभागाकरीता करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात विजतंत्री व पंपचालक यापदी १) मनिष कैलास सोनवणे २) संदिप प्रभाकर पुंड ३) गहिनीनाथ अंबादास मेने यांचा अटी व शर्तीनुसार मानधनावरील पुर्ननियुक्तीचा कालावधी दि. ०३/०३/२०२२ ते ०२/०९/२०२२ अखेर सहा महिन्याकरिता असुन सदरची मुदत ही दि. ०३ / ०९ / २०२२ रोजी पासुन समाप्त होणार असल्याने पाणी विभागामध्ये मोठ्याप्रमाणात तांत्रिक कर्मचा-यांची आवश्यकता असल्याने संबधितांना तीन दिवसाचा तांत्रिक खंड देवून पुढील नियुक्तीबाबत " नमुद करुन सुचित केलेले आहे.

सद्यस्थितीमध्ये मा. स्थायी समिती ठराव क्रमांक ३५ दिनांक १०/०६/२०२२ अन्वये पारीत मंजुरी ठरावाच्या अनुषंगाने जा.क्र.आस्था.करारबध्द नेमणुक २६२३ दि. १४/०७/२०२२ अन्वये पाणी पुरवठा विभागासाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात विजतंत्री व पंपचालक यापदी १) संदिप प्रभाकर पुंड २) मनिष कैलास सोनवणे ३) गहिनीनाथ अंबादास मेने यांची रु. १४,०००/- या दरमहा मानधनावर तांत्रिक खंड देवून दि. ०३/०३/२०२२ पासुन सहा महिन्याकरीता अटी व शर्तीप्रमाणे करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली असुन सदरच्या कालावधीतील केलेल्या करारबध्द मानधनावरील नियुक्तीची मुदत ही दि. ०३/०९/२०२२ रोजी पासुन समाप्त झालेली आहे.

तरी संदर्भिय अहवालाच्या अनुषंगाने व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामधील कलम ५३ च्या तरतुदीनुसार पाणी पुरवठा विभागासाठी करारानुसार खालील तक्त्यात दर्शविलेल्या संबधितांची तात्पुरत्या स्वरुपात नमुद केलेल्या दरमहा मानधनावर त्यांना तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे करारबध्द पुर्ननियुक्ती करणेबाबत मा. स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणेकामी निर्णयाकरिता सादर करणेकरिता मा. मुख्य लेखाधिकारी व मा. मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय घेवुन सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीकडे पाठविणेस मंजुरीस्तव आदेशार्थ सादर.

| अ.क्र. | नांव | तात्पुरत्या स्वरुपात पदनाम | दरमहा मानधन रक्कम | रुजु होण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | संदिप प्रभाकर पुंड | विजतंत्री | १४,०००/- | पाणी पुरवठा विभाग |
| २ | मनिष कैलास सोनवणे | विजतंत्री | १४,०००/- | पाणी पुरवठा विभाग |
| ३ | गहिनीनाथ अंबादास मेने | पंपचालक | १४,०००/- | पाणी पुरवठा विभाग |

येणे प्रमाणे लिपिक व मुख्य लिपिक यांचा अभिप्राय असे.

यावर मा.सहा.आयुक्त (आस्था) यांचा अभिप्राय की,प्रस्तावित "अ" बाबत आदेशार्थ व निर्णयास्तव सादर.

येणे प्रमाणे लिपिक व मुख्य लिपिक यांचा अभिप्राय असे.

यावर मा.सहा.आयुक्त (आस्था) यांचा अभिप्राय की,प्रस्तावित "अ" बाबत आदेशार्थ व निर्णयास्तव सादर.

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की,मानधनावरील मुदववाढीबाबत आदेशार्थ सादर.

यावर अंतर्गत लेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,मा.शासन सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.एस.आार.व्ही.२००५ /प्र.क्र.४७/१२ दि.२५ /८/ २००५ मधील परिच्छेद क्र.५ "सर्व पदावरील नियुत्या विहीत मार्गाने / माध्यमामार्फत करण्याची दक्षता घ्यावी,अत्यंत तातडीची गरज म्हणून तात्पुरत्या अस्थायी नियुक्या कराव्या लागल्यातर त्या विहीत वेळेत संपुष्टात आणण्याची दक्षता घ्यावी असे नमुद केले आहे प्रस्तावात मुळ नियुक्ती दिनांक नमुद करणेत यावे.

प्रस्तावित विजतंत्री व पंपचालक या पदी पुढील मुदतवाढ देताना उपरोक्त शासन परिपत्रकाचे अवलोकन करून उचित कार्यवाही करण्यात यावी.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की,प्रस्तावित केल्यानुसार आदेशार्थ व निर्णयास्तव सादर.

यावर मा.अति.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,प्रस्तावित केल्यानुसार निर्णयास्तव मा.स्थायी समिती कडे पाठविण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,"अ" मान्य

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात विजतंत्री व पंपचालक यापदी संदिप प्रभाकर पुंड,मनिष कैलास सोनवणे व गहिनीनाथ अंबादास मेने यांची तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर कराराबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

मा.सभापती साहेब :- या मानधनावरील कर्मचा-यांचे काम समाधानकारक आहे का?

जल अभियंता श्री.निकम :- हो, चांगले काम आहे.

मा.श्री.रविंद्र बारस्कर :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.सौ.रिता भाकरे :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात विजतंत्री व पंपचालक यापदी संदिप प्रभाकर पुंड,मनिष कैलास सोनवणे व गहिनीनाथ अंबादास मेने यांची तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर कराराबध्द पुर्ननियुक्ती करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात विजतंत्री व पंपचालक यापदी संदिप प्रभाकर पुंड,मनिष कैलास सोनवणे व गहिनीनाथ अंबादास मेने यांची तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर कराराबध्द पुर्ननियुक्ती करण्यास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजुर.खर्च मंजुर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.रविंद्र बारस्कर सही/-

अनुमोदक :- मा.सौ.रिता भाकरे सही/-

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : १०**

**विषय क्रमांक : ११०** **दिनांक :- २१/११/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी स्नेहल राजेंद्र मुळे व (मेकॅनिकल) यापदी राहुल सदाशिव गिते व प्रदिप सदाशिव ढगे यांची तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरिता करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुरः-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

उपरोक्त विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की, पाणी पुरवठा विभाग यांनी त्यांचेकडील जा. क्र. पाणी पुरवठा विभाग ८५३ दि. १६/०९/२०२२ अन्वये प्रस्ताव सादर करुन त्यामध्ये " पाणी पुरवठा विभागाकरीता करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी स्नेहल राजेंद्र मुळे यांची दि. १४/०३/२०२२ ते १३/०९/२०२२ अखेर असुन त्यांची मुदत दि. १४/०९/२०२२ पासुन समाप्त होत असल्याने त्यांना तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर पुर्ननियुक्ती करणे बाबत तसेच पाणी पुरवठा विभाग यांनी त्यांचेकडील जा.क्र.पाणी पुरवठा विभाग ८५४ दि.१६/९/२०२२ अन्वये प्रस्ताव सादर करून त्यामध्ये तात्पुरत्या स्वरुपात कनिष्ठ अभियंता (मॅकेनिकल) यापदी १) राहुल सदाशिव गिते २) प्रदिप सदाशिव ढगे यांची दि. २८/०३/२०२२ ते २७/०९/२०२२ अखेर असुन त्यांची मुदत दि. २८/०९/२०२२ पासुन समाप्त होत असल्याने त्यांना तीन दिवसाचा तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर पुर्ननियुक्ती करणेबाबत." सुचित केलेले आहे.

सद्यस्थितीमध्ये मा. स्थायी समिती ठराव क्रं. ११ दिनांक १८/०४/२०२२ अन्वये पुर्व मंजुरी पारीत ठरावाच्या अनुषंगाने जा. क्र. आस्था. करारबध्द नेमणुक १९३९ दि. २०/०५/२०२२ अन्वये पाणी पुरवठा विभागासाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी स्नेहल राजेंद्र मुळे यांची रु. २५,०००/- या दरमहा मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवून दि. १४/०३/२०२२ पासुन सहा महिन्याकरीता व जा. क्र. आस्था. करारबध्द नेमणुक १९३८ दि. २०/०५/२०२२ अन्वये तात्पुरत्या स्वरुपात कनिष्ठ अभियंता (मॅकेनिकल) यापदी १) राहुल सदाशिव गिते २) प्रदिप सदाशिव ढगे यांची रु. २५,०००/- या दरमहा मानधनावर अटी व शर्तीप्रमाणे तांत्रिक खंड देवून दि. २८/०३/२०२२ पासून सहा महिन्याकरीता करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली असुन सदरच्या कालावधीतील केलेल्या करारबध्द मानधनावरील श्रीमती मुळे यांची नियुक्तीची मुदत दि. १४/०९/२०२२ रोजी पासुन समाप्त होणार असून श्री. गिते व ढगे यांची दि. २८/०९/२०२२ रोजी पासून नियुक्ती मुदत ही समाप्त होणार आहे.

तरी वरील संदर्भिय अहवालाच्या अनुषंगाने व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदीनुसार पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार १) स्नेहल राजेंद्र मुळे २) राहुल सदाशिव गिते ३) प्रदिप सदाशिव ढगे यांची तात्पुरत्या स्वरुपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) व (मेकॅनिकल) यापदी तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे रुपये २५,०००/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतच्या प्रस्तावास मा. स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणेकामी निर्णयासाठी सादर

करणेकरिता मा. मुख्य लेखाधिकारी व मा. मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय होवुन सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीकडे पाठविणेस मंजुरीस्तव आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे लिपिक टंकलेखक व मुख्य लिपिक यांचा अहवाल असे.

यावर मा.सहा.आयुक्त (आस्था) यांचा अभिप्राय की,प्रस्तावित "अ" बाबत आदेशार्थ व निर्णयास्तव सादर.

यावर मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की,मानधनावरील मुदतवाढीबाबत आदेशार्थ सादर.

यावर मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,यावर मा.शासन सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.एस.आर.व्ही.२००५/प्र.क्र.४७/०५/१२ दि.२५/०८/२००५ मधील परि-०५ मध्ये सर्व पदावरील नियुक्त्या विहीत मार्गाने /माध्यमामार्फत करण्याची दक्षता घेण्यात यावी,अत्यंत तातडीची गरज म्हणून तात्पुरत्या अस्थायी नियुक्त्या कराव्या लागल्यावर त्या विहीत वेळेत संपुष्टात आणण्याची दक्षता घ्यावी.प्रस्तावित कनिष्ठ अभियंता या पदी पुढील मुदतवाढ देताना उपरोक्त शासन परिपत्रकाचे अवलोकन करून उचित कार्यवाही करावी.

यावर मा.उपायुक्त(सा) यांचा अभिप्राय की,प्रस्तावित केल्यानुसार आदेशार्थ व निर्णयास्तव सादर.

यावर अतिरीक्त आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,"अ " मध्ये प्रस्तावित केल्यानुसार मा.स्थायी समिती कडे पाठविण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी स्नेहल राजेंद्र मुळे व (मेकॅनिकल) यापदी राहुल सदाशिव गिते व प्रदिप सदाशिव ढगे यांची तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरिता करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.सभापती साहेब :- मध्यंतरीच्या काळामध्ये महानगरपालिकेमध्ये अपु-या असणा-या इंजिनियर्स यांच्या जागा भरणे कामी उमेदवांच्या मुलाखती घेण्यात आल्या होत्या त्याचा अदयाप निर्णय झालेला नाही.महानगरपालिकेतील काम कमी झालेले आहे काय?किंवा महानगरपालिकेस तांत्रिक कर्मचा-यांची आवश्यकता नाही काय ? सदर मुलाखतींचा अदयाप निर्णय का झालेला नाही?

मा.उपायुक्त (सा) श्री.कुरे :- घेण्यात आलेल्या मुलाखतींचा निर्णय होणे बाकी आहे.त्यावर कामकाज चालू आहे.

मा.सभापती साहेब :- या पुर्वी महानगरपलिकेमध्ये ज्या डिल्पोमा धारक इंजिनीयर्स यांनी काम केलेले आहे.त्यांना कामाचा अनुभव आहे.अशांना कामावर घेणे बाबतचा प्रस्ताव देण्यात यावा.त्यांच्या अनुभवाचा महानगरपलिकेस फायदा होईल.

शहर अभियंता श्री.इथापे :- महानगरपालिकेमध्ये इंजिनीय यांची संख्या अपुरी असल्यामुळे कामकाज वेळेवर होत नाही.आहे त्या कर्मचा-यांवर कामाचा ताण वाढतो आहे.बांधकाम विभागाकरीता पाच इंजि.आवश्यकता आहे.

आस्थापना विभाग प्रमुख श्री.साबळे :- ज्या विभागांना कर्मचा-यांची आवश्यकता असेल त्या विभागाने प्रस्ताव ठेवून बाहययंत्रणेमार्फत मनुष्यबळ उपलब्ध करून घ्यावे.

मा.अति.आयुक्त श्री.पठारे :- आउटसोर्सींग अथवा मानधनावर विभागाला आवश्यक असेल तेवढा कर्मचारी वर्ग उपलब्ध करून घेता येईल.

मा.सभापती साहेब :- प्रभागामध्ये कामे होणे आवश्यक आहे.ज्या ज्या विभागांना कर्मचा-यांची आवश्यकता असेल त्यांनी मानधनावर इंजिनीयर घेणे बाबत आजच प्रस्ताव सादर करण्यात यावेत.

मा.श्री.समद खान :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.सौ.मिना चव्हाण :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी स्नेहल राजेंद्र मुळे व (मेकॅनिकल) यापदी राहुल सदाशिव गिते व प्रदिप सदाशिव ढगे यांची तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरिता करारबध्द पुर्ननियुक्तीस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजुर.खर्च मंजुर.

इंजिनीयर संख्या अत्यंत कमी असल्याने मनपाचे कामकाज अत्यंत संथ गतीने होत आहे.सिव्हील , मेकॅनिकल ,इलेक्ट्रीक इ.डिप्लोमा झालेल्यां तरूणांची संख्या शहरामध्ये मोठया प्रमाणात असुन त्यांना रोजगाराची सुध्दा अत्यंत आवश्यकता आहे.या तरूणांना रोजगार उपलब्ध होण्याकरीता व मनपाचे कामकाज गतीमान होण्याकरीता विभागाला आवश्यक असेल तेवढा कर्मचा-यांचे प्रस्ताव तात्काळ प्रशासनाकडे सादर करावेत.तसेच तात्काळ जाहिरात प्रसिध्द करून उमेदावारांची शैक्षणीक पात्रता डिप्लोमा असलेल्या व ज्यांनी या पुर्वी अ.नगर मनपामध्ये मानधनावर काम केले असेल परंतु काही कारणास्तव त्यांनी काम सोडले असेल अशा उमेदवारांना प्राधान्य देण्यात येवून मानधनावर घेणे बाबतची प्रक्रिया तात्काळ राबविण्यात यावी.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी स्नेहल राजेंद्र मुळे व (मेकॅनिकल) यापदी राहुल सदाशिव गिते व प्रदिप सदाशिव ढगे यांची तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरिता करारबध्द पुर्ननियुक्तीस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजुर.खर्च मंजुर.

महानगरपालिकेमध्ये इंजिनीयर संख्या अत्यंत कमी असल्याने महानगरपालिकेचे कामकाज अत्यंत संथ गतीने होत आहे.सिव्हील , मेकॅनिकल ,इलेक्ट्रीक इ.डिप्लोमा झालेल्यां तरूणांची संख्या शहरामध्ये मोठया प्रमाणात असुन त्यांना रोजगाराची सुध्दा अत्यंत आवश्यकता आहे.या तरूणांना रोजगार उपलब्ध होण्याकरीता व महानगरपालकेचे कामकाज गतीमान होण्याकरीता विभागाला आवश्यक असेल तेवढा कर्मचा-यांचे प्रस्ताव तात्काळ प्रशासनाकडे सादर करावेत.तसेच तात्काळ जाहिरात प्रसिध्द करून उमेदावारांची शैक्षणीक पात्रता डिप्लोमा असलेल्या व ज्यांनी या पुर्वी अहमदनगर महानगरपालिकेमध्ये मानधनावर काम केले असेल परंतु काही कारणास्तव त्यांनी काम सोडले असेल अशा उमेदवारांना प्राधान्य देण्यात येवून मानधनावर घेणे बाबतची प्रक्रिया तात्काळ राबविण्यात यावी.

कायदेशीर व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.समद खान सही/-

अनुमोदक :- मा.सौ.मिना चव्हाण सही/-

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : १०**

**विषय क्रमांक : १११** **दिनांक :- २१/११/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी विभागासाठी तात्पुरत्या स्वरूपात तांत्रिक पदावर अटी व शर्ती प्रमाणे नियुक्ती केलेल्या मानधन वरील करारबध्द नियुक्ती वरील मुदत संपत असलेल्या उमेदवारांच्या पुर्ननेमणूक करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर:-** अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी विभाग

**संदर्भ :-** १. रक्तपेढी विभाग जा.क्र.८० दि.२६/०७/२०२२ अन्वये २.रक्तपेढी विभाग जा.क्र.७७ दि.२१/०७/२०२२ अन्वये ३.रक्तपेढी आवक क्र.६२ दिनांक २०/९/२०२२ ,रक्तपेढी आवक क्र.६४दिनांक २१/९/२०२२ (पुर्ननियक्ती बाबत विनंती अर्ज )

उपरोक्त विषयान्वये विनंती पुर्वक अहवाल देण्यात येतो की,रक्तपेढी विभागामध्ये खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे कर्मचारी तात्पुरत्या स्वरूपात ,रक्तपेढी विभागामध्ये मानधनावर काम करत असुन तक्त्यात नमुदकेल्या प्रमाणे अ.क्र.२ ते ५ यांचा कालावधी दि.९/११/२०२२ अखेर आहे व अ.क्र.१ कालावधी २३/११/२०२२ ,अ.क्र.६,७ यांचा कालावधी ३/१२/२०२२ अखेर आहे.तर अ.क्र.८ चा कालावधी ३/१/२०२३ अखेर आहे.सदर कर्मचा-यांचे काम समाधानकारक असुन रक्तपेढी विभागासाठी सदर कर्मचा-यांची आवश्यकता आहे.

| अ.क्र. | नांव | पद | मुदत संपणाण्याचा कालावधी | मासिक मानधन | सहा महिन्या करिता एकुण खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | डॉ.सोमनाथ नंदकर | रक्त संक्रमण अधिकारी | २३/११/२०२२ | ७५०००/- | ४५००००/- |
| २ | संतोष भाउसाहेब काळे | जनसंपर्क अधिकारी | ९/११/२०२२ | २००००/- | १२००००/- |
| ३ | सुनिता संपत पवार | लॅब टेक्निशीयन | ९/११/२०२२ | १७०००/- | १०२०००/- |
| ४ | स्नेहल अशोक गायकवाड | परिचारीका | ९/११/२०२२ | २००००/- | १२००००/- |
| ५ | योगीता सुहास गायकवाड | परिचारीका | ९/११/२०२२ | २००००/- | १२००००/- |
| ६ | पतंगे सर्जेराव विश्वनाथ | लॅब टेक्निशीयन | ३/१२/२०२२ | १७०००/- | १०२०००/- |
| ७ | अन्सारी ईबार तुनिसा | परिचारीका | ३/१२/२०२२ | २००००/- | १२००००/- |
| ८ | शेख नईम युसुफ | लॅब टेक्निशीयन | ३/१/२०२२ | १७०००/- | १०२०००/- |
| | | | | | १२,३६,०००/- |

तरी उपरोक्त तक्त्यात नमुद केल्या प्रमाणे कर्मचा-यांना नियमा प्रमाणे तांत्रिक खंड देवून अ.क्र.२ ते ५ नियमा प्रमाणे तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवुन दि.१३/११/२०२२ पासुन व अ.क्र.१ यांना २६/११/२०२२ पासुन व अ.क्र.६ आणि ७ यांना ७/१२/२०२२ तसेच अ.क्र.८ यांना ६/१/२०२३ पासुन पुढील सहा महिन्या करिता नियुक्ती देणेस व १००रू.स्टॅम्प पेपरवर करारनामा करून घेणेस व त्या अनुशंगाने येणा-या रू.१२,३६,०००/- च्या खर्चास व सदर चा

खर्च लेखाशिर्षक ,रक्तपेढी कंत्राटी कर्मचारी मानधन सन २०२२-२०२३ या मधुन करणे कमी मा.स्थायी समिती कडे पाठविणेस व स्थायी समितीची मंजुरी मिळणेकामी मान्यतेस्तव सविनय सादर.

येणे प्रमाणे रक्तसंक्रमण अधिकारी यांचा अहवाल असे.

यावर मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की,मुदतवाढीबाबत आदेशार्थ सादर.

यावर मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,यावर मा.शासन सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.एस.आर.व्ही.२००५/प्र.क्र.४७/०५/१२ दि.२५ऑगस्ट २००५ मधील परिच्छेद -०५ मध्ये सर्व पदावरील नियुक्त्या विहीत मार्गाने /माध्यमामार्फत करण्याची दक्षता घ्यावी,अत्यंत तातडीची गरज म्हणून तात्पुरत्या अस्थायी नियुक्त्या कराव्या लागल्यावर त्या विहीत वेळेत संपुष्टात आणण्याची दक्षता घ्यावी.असे नमुद केले आहे.

प्रस्तावित पुढील मुदतवाढ देताना उपरोक्त शासन परिपत्रकाचे अवलोकन करून उचित राहिल.

१.शासन निर्णय वित्त विभाग दि.२७ एप्रिल २०२२ मधील परिच्छेद (१) प्रमाणे मुळ पदाच्या एकुण खर्चाच्या २० ते ३० टक्के इतकी बचत होत असलेबाबत विभागाने खात्री करावी.

२.रक्तसंक्रमण अधिकारी यांचे मानधन कशाच्या आधारे निश्चित केलेले आहे.सधार स्पष्ट करावे.तसेच मंजुर आकृतीबंधानुसार रक्त संक्रमण अधिकारी यांचे वेतनाबाबत तपशिल नमुद करून वरील शासन निर्णयाप्रमाणे आर्थिक बचत होती किंवा कसे?याबाबत विभागाने साधार स्पष्ट करावे.

यावर रक्तसंक्रमण अधिकारी यांचा अभिप्राय की,फेरसादर मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे दि.०४/१०/२०२२ च्या अभिप्रायानुसार फेरसादर करण्यात येते की,रक्तसंक्रमण अधिकारी यांचे मानधन रू.७५,०००/- ठरवताना राज्य रक्तसंक्रमण परिषद यांचे कडे दिले जाणारे मानधनानुसार तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान यांचेकडे एम.डी.शैक्षणिक पात्रता असणा-या वैदयकीय अधिकारी यांना देण्यात येणारे मानधन विचारात घेवुन रक्तपेढी पुनः चालु करणेसाठी ४ वैदयकीय अधिकारी असणे आवश्यक होते.तसेच अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढीने खाजगी करण करू नये या बाबत येथील बहुजन आघाडी श्री.प्रतिक अरविंद बारसे व श्री.वैभव कदम सामाजिक कार्यकर्ते व पदाधिकारी यांचे मा.अहमदनगर मनपा यांना निवेदन होते.

रक्तपेढी चालू करणेकामी वैदयकीय अधिकारी भरणे आवश्यक होते व मानधना अभावी सदर पदावर काम करण्याची वैदयकीय अधिकारी तयार नव्हते.कमी मानधन असल्याने डॉ.रूपाली कुलकर्णी ,डॉ.साहील ,डॉ.मुकुंद तांदळे इत्यादी काम सोडुन गेले आहेत.त्या अनुषंगाने प्रशासकिय मंजुरी घेवून रक्तसंक्रमण अधिकारी यांचे मानधन ठरविण्यात आलेले आहे.

तथापी प्रस्तावित नुसार पुर्ननेमणुकी बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती कडे पाठविण्यास व मा.स्थायी समितीची मंजुरी मिळणेकामी मान्यतेस्तव सविनय सादर.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,रक्तसंक्रमण अधिकारी यांचे फेरसादर खुलाशानुसार उचित निर्णयास्तव सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,"अ" प्रमाणे

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी विभागासाठी तात्पुरत्या स्वरूपात तांत्रिक पदावर अटी व शर्ती प्रमाणे नियुक्त्ी केलेल्या मानधन वरील करारबध्द नियुक्ती वरील मुदत संपत असलेल्या उमेदवारांच्या पुर्ननेमणूक करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

मा.श्री.रविंद्र बारस्कर :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.परशराम गायकवाड :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.सौ.रिता भाकरे :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी विभागासाठी तात्पुरत्या स्वरूपात तांत्रिक पदावर अटी व शर्ती प्रमाणे नियुक्त्ी केलेल्या मानधन वरील करारबध्द नियुक्ती वरील मुदत संपत असलेल्या उमेदवारांच्या पुर्ननेमणूक करणेस मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी विभागासाठी तात्पुरत्या स्वरूपात तांत्रिक पदावर अटी व शर्ती प्रमाणे ऑफिस रिपोर्ट मध्ये नमुद करण्यात आलेल्या कर्मचा-यांना नियमा प्रमाणे तांत्रिक खंड देवून अ.क्र.२ ते ५ नियमा प्रमाणे तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवुन दि.१३/११/२०२२ पासुन व अ.क्र.१ यांना २६/११/२०२२ पासुन व अ.क्र.६ आणि ७ यांना ७/१२/२०२२ तसेच अ.क्र.८ यांना ६/१/२०२३ पासुन पुढील सहा महिन्या करिता नियुक्ती देणेस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजुर.खर्च मंजुर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.परशराम गायकवाड सही/-

अनुमोदक :- मा.सौ.रिता भाकरे सही/-

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : १०**

**विषय क्रमांक : ११२** **दिनांक :- २१/११/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महनगरपालिका कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका यापदी मोहीनी अशोक गुंजाळ (बेरड) यांची तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकुर:-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

**संदर्भ-** कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना यांचेकडील जा.क्र.कै.बा.दे.दवा.३९१ दि.२१/०९/२०२२अन्वयेचा प्रस्ताव

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की,प्र.वैदयकीय अधिक्षक,बा.दे.दवा.यांनी त्यांचेकडील जा.क्र.३९१ दि.२१/०९/२०२२ अन्वये प्रस्ताव सादर करून त्यामध्ये "कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्याकरीता करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका यापदी मोहिनी अशोक गुंजाळ (बेरड) यांचा अटी व शर्तीनुसार मानधनावरील पुर्ननियुक्तीचा कालावधी दि.०४/०६/२०२२ ते ०३/१२/२०२२ अखेर सहा महिन्यांकरिता असून सदरची मुदत ही दि. ०४/१२/२०२२ रोजी पासुन समाप्त होणार असल्याने त्यांना तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवून पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर पुर्ननियुक्ती करणे बाबत" सुचित केलेले आहे.

कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना यांचेकडील जा.क्र.९० दि.०९/०५/२०२२ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने सद्दयस्थितीमध्ये मा.स्थायी समिती ठराव क्र.५५ दिनांक १५/०७/२०२२अन्वयेच्या मान्यता पारित ठरावानुसार जा.क्र.आस्था कालबध्द नेमणुक २८२८ दि.१८/०८/२०२२ अन्वये कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्यासाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात परिचारीका यापदी मोहिनी अशोक गुंजाळ (बेरड) यांची रू.११,४४०/- या दरमहा मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवून दि.०४/०६/२०२२ पासुन सहा महिन्याकरीता करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली आहे,सदर नियुक्तीची मुदत ही दिनांक ०४/१२/२०२२ रोजी पासुन समाप्त होणार आहे.

तरी कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना यांचेकडील वरील संदर्भिय अहवालाच्या अनुषंगाने व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कमल ५३ च्या तरतुदी नुसार कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्यास्वरूपात परिचारीका यापदी तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवुन मोहिनी अशोक गुंजाळ (बेरड) यंची पुढील सहा महिन्यांकरिता अटी व शर्ती प्रमाणे रूपये ११,४४०/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणेकामी निर्णयासाठी सादर करणे बाबत निर्णय झाल्यास उक्त प्रकरणी मा.मुख्यलेखाधिकारी व मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय घेवून सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविणेस मंजुरीस्तव आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे लिपीक टंकलेखक व प्र.मुख्य लिपीक यांचा अहवाल असे.

यावर मा.सहाय्यक आयुक्त (आस्था) प्रस्तावित केलेनुसार मान्यतेस्तव सादर

यावर मा.उपायुक्त यांचा अभिप्राय की,मुलेअ/मुलेप अभिप्राय

यावर मा.मुख्यलेखाअधिकारी यांचा अभिप्राय की, मानधनावर पुर्ननियुक्तीबाबत आदेशार्थ सादर.

यावर प्र.लेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,मा.शासन सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.एस.आर.व्ही.-२००५/प्र.क्र.४७ /०५/१२ दिनांक २५ ऑगस्ट २००५ मधील परिच्छेद ५ मध्ये "सर्व पदावरील नियुत्या विहीत मार्गाने /माध्यमामार्फत करण्याची दक्षता घ्यावी अत्यंत तातडीची गरज म्हणून तात्पुरत्या / अस्थायी नियुत्या कराव्या लागल्यातर त्या विहीत वेळेत संपुष्टात आणण्याची दक्षता घ्यावी " असे नमुद केले आहे.प्रस्तावित परिचारिका यापदी पुढील मुदतवाढ देताना उपरोक्त शासन परिपत्रकान्वये अवलोकन करून उचित कार्यवाही करण्यात यावी.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, प्रसतावित "अ" " ब" "क" व "ड" मधील अभिप्रायानुसार पुढील निर्णयाठी मा.स्थायी समितीसमोर निर्णयार्थ ठेवण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.अति.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, "अ" मध्ये प्रस्तावित केल्यानुसार निर्णयास्तव मा.स्थायी समिती कडे पाठविण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महनगरपालिका कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका यापदी मोहीनी अशोक गुंजाळ (बेरड) यांची तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्ट

मा.श्री.परशराम गायकवाड :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.श्री.सचिन शिंदे :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी स्नेहल राजेंद्र मुळे व (मेकॅनिकल) यापदी राहुल सदाशिव गिते व प्रदिप सदाशिव ढगे यांची तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरिता करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महनगरपालिका कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका यापदी मोहीनी अशोक गुंजाळ (बेरड) यांची तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजुर.खर्च मंजुर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.परशराम गायकवाड सही/-

अनुमोदक :- मा.श्री.सचिन शिंदे सही/-

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : १०**

**विषय क्रमांक : ११३** **दिनांक :- २१/११/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** नुतन जिल्हाधिकारी कार्यालय,अहमदनगर,मार्गावर शहर बससेवा सुरू करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर:-** अहमदनगर महानगरपालिका मोटार व्हेईकल विभाग

उपरोक्त संदर्भ व विषयान्वये कळविण्यात येते की,नूतन जिल्हाधिकारी कार्यालय,अहमदनगर हे नगर-औरंगाबाद रस्त्यावरील शासकीय विश्रामगृह परिसर नवीन वास्तूत स्थलांतरीत झालेले असून प्रशासनाने नागरिकांचे सोयी करिता शहर बससेवा तातडीने सुरू करावी,या बाबतचे पत्र मार्गासह प्राप्त झाले आहे.तसेच संदर्भिय क्र.१ नुसार वृत्तपत्रात देखील प्रसिध्द झालेले आहे.

शहरातील नवीन बसमार्ग सुरू करणे असल्यास ,बसमार्ग थांबे,अंतर,इत्यादी सह सर्व्हे करून त्यास सक्षम प्राधिकरणाची मंजूरी आवश्यक राहील.तसेच महानगरपालिकेमध्ये बससेवे बाबतचे कराराप्रमाणे सर्व अधिकार मा.स्थायी समितीस आहेत.यास्तव नुतन जिल्हाधिकारी कार्यालय,अहमदनगर या मार्गावर बससेवा सुरू करणे कामी सदर प्रकरण मा.स्थायी समितीकडे पाठविणेस मंजूरीस सादर.

येणे प्रमाणे वरिष्ठ लिपीक यांचा अहवाल असे.

यावर मेकॅनिकल इंजी.यांची स्वाक्षरी.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचाअभिप्राय की,सर्व सक्षम प्रधिकरणच्या प्रथम मंजुरी घेणेत यावी.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- नुतन जिल्हाधिकारी कार्यालय,अहमदनगर,मार्गावर शहर बससेवा सुरू करणे बाबत ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.सौ.मिना चव्हाण:- सावेडी उपनगरतील निर्मलनगर,लेखानगर,माउली मंदिर,ढवणवस्ती,कसबेवस्ती, पवननगर,गोकुळनगर,भिस्तबाग चौक या मार्गे सिटीबस सुरू करण्यात यावी.अशी मी प्रभागातील नगरीकांच्या वतीने करीत आहे.तरी सदर मार्गे सिटी बससेवा सुरू करणे बाबत मा.स्थायी समितीने मंजुरी दयावी ही विनंती.

मा.श्री.सचिन शिंदे :- बसस्टॅण्ड पासून कल्याण रोड या मार्गावर बससेवा सुरू करणे बाबत मी अनेक वेळा मागणी केली आहे.त्याबाबत ठराव देखील पारीत झालेले आहे.परंतु अदयापर्यत या मार्गावर बस सेवा सुरू करण्यात आलेली नाही.तरी कल्याण रोडवर बससेवा सुरू करणे बाबत मान्यता देण्यात येवून ठराव करण्यात यावा हि विनंती.

मा.सभापती साहेब :- नुतन जिल्हाधिकारी कार्यालय,अहमदनगर,मार्गावर शहर बससेवा सुरू करणेस मान्यता देण्यात येत आहे.

सभेमध्ये झालेल्या चर्चे नुसार सावेडी गावठाण येथुन बोल्हेगांव गावठाण ते बोल्हेगांव फाटा यामार्गावर बस सेवा सुरू करणेस तसेच स्थायी समिती सदस्या मा.सौ.मिनाताई चव्हाण यांनी दिलेल्या

पत्रा नुसार सावेडी उपनगरातील निर्मलनगर,लेखानगर,माउली मंदिर, ढवणवस्ती,कसबेवस्ती,पवननगर, गोकुळनगर,भिस्तबाग चौक या मार्गे सिटीबस सुरू करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच मा.श्री.सचिन शिंदे यांच्या मागणी नुसार बसस्टॅण्ड ते कल्याण रोड या मार्गावर बससेवा सुरू करणे बाबत यापुर्वी केलेल्या ठरावास योग्य त्या प्रधिकरणाची मान्यता घेण्यात यावी.या मार्गावर बससेवा सुरू करण्यात यावी.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार नुतन जिल्हाधिकारी कार्यालय,अहमदनगर,मार्गावर शहर बससेवा सुरू करणेस मान्यता देण्यात येत आहे.

सभेमध्ये झालेल्या चर्चे नुसार सावेडी गावठाण येथुन बोल्हेगांव गावठाण ते बोल्हेगांव फाटा यामार्गावर बस सेवा सुरू करणेस तसेच स्थायी समिती सदस्या मा.सौ.मिनाताई चव्हाण यांनी दिलेल्या पत्रा नुसार सावेडी उपनगरातील निर्मलनगर,लेखानगर,माउली मंदिर, ढवणवस्ती,कसबेवस्ती,पवननगर, गोकुळनगर,भिस्तबाग चौक या मार्गे सिटीबस सुरू करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच मा.श्री.सचिन शिंदे यांच्या मागणी नुसार बसस्टॅण्ड ते कल्याण रोड या मार्गावर बससेवा सुरू करणे बाबत यापुर्वी केलेल्या ठरावास योग्य त्या प्रधिकरणाची मान्यता घेण्यात यावी.या मार्गावर बससेवा सुरू करण्यात यावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.सचिन शिंदे सही/-

अनुमोदक :- मा.सौ.मिना चव्हाण सही/-

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही/-

सभापती

स्थायी समिती

अहमदनगर महानगरपालिका

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## मा.स्थायी समिती सभा क्रमांक : १०

**विषय क्रमांक : ११४** **दिनांक :- २१/११/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार श्री.भाउसाहेब नामदेव कातोरे रा.नागापुर नागापुर उपविभाग,वॉर्ड क्र.७३ बिल क्र.१२६/१ मालमत्ता क्र.Z१७३३०३१२८७ सदर मिळकत अस्तीत्वात नसतांना आकारण्यात आलेली मालमत्ता कराची आकारणी रक्कम निर्लेखित करणे बाबत ऑफिस रिपोर्ट मंजुर.

**प्रस्तावाचा मजकुर:-** अहमदनगर महानगरपालिका नागापुर उपविभाग कार्यालय

विनंती पुर्वक अहवाल वसुली लिपीक वॉर्ड क्र.७३ यांजकडुन देण्यात येतो की,अर्जदार श्री.भाउसाहेब नामदेव कातोरे रा.नागापुर यांनी मिळकत नावे श्री. भाउसाहेब ना कातोरे वॉर्ड क्र.७३ बिल क्र.१२६/१ मालमत्ता क्र Z१७३३०३१२८७ ही मिळकत अस्तित्वात नसताना आलेले चुकिचे बिल रद्द करण्याबाबत अर्ज महानगरपालिकेकडे केलेला आहे.

त्या करिता अर्जदार यांच्या अर्जाप्रमाणे वॉर्ड क्र.७३ मध्ये समक्ष पाहणी केली असता श्री.भाउसाहेब ना कातोरे वॉर्ड क्र.७३ बिल क्र.१२६/१ मालमत्ता क्र Z१७३३०३१२८७ ही संगणकावर पाहणी केली असता व रिव्हीजन रजिस्टर व परिशिष्ठ "अ" चे सर्व अभिलेख तपासणी केली असता कोठेही नोंद आढळुन येत नाही.

त्या करीता मिळकत नावे श्री.भाउसाहेब ना कातोरे वॉर्ड क्र.७३ बिल क्र.१२६/१मालमत्ता क्र Z१७३३०३१२८७नागापुर या मिळकतीची कर आकारणी सन २०२२-२३ अखेर रू.१,८७,१६३/- + २% दंडात्मक कर प्रस्ताव मंजुरीस्तव सविनय सादर.

यणे प्रमाणे वसुली लिपीक यांचा अहवाल असे.

यावर कर निरीक्षक यांचा अभिप्राय की,वसुली लिपीक यांनी प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे रक्कम निर्लेखित करून मालमत्ता रद्द करण्यास मंजुरीस्तव सविनय सादर.

यावर प्रभाग अधिकारी प्रभाग समिती क्र.१ यांचा अभिप्राय की,कर निरीक्षक यांचा अभिप्राय तसेच वसुली लिपीक यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार अस्तित्वात नसलेली मालमत्ता निर्लेखित करणे उचित वाटते.

यावर सहाय्यक कर निरीक्षक व संग्राहक यांचा अभिप्राय की,सदर प्रकरणी विभागाने सादर केलेल्या अहवालानुसार मिळकतधारक यांची मिळकत सदर वॉर्ड नं.७३ मध्ये इतर दोन ठिकाणी असुन सदर बिलनंबरवर चुकीची आकारणी झाल्याचे दिसुन येते.तरी सदर बिलावरील शास्तीची रक्कम महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण -८ कराधान नियम ५१ अन्वये मा.आयुक्त साहेब यांचे स्वेच्छा निर्णसानुसार माफ करता येईल.तसेच सदर बिलावरील थकबाकीची रक्कम रूपये निव्वळ ७८,०८४/-+ शास्ती रक्कम रू.१,०९,०७९/- एकुण रूपये १,७८,१६३/- महानगरपालिका अधिनियमातील कलम १५२ नुसार मा.स्थायी समितीच्या मान्यतेने निर्लेखीत व सदरचे बिल रद्द करणे योग्य होईल.तथापी आदेशार्थ सादर.

यावर मा.सहा.आयुक्त यांचा अभिप्राय की,विभागाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार व सहा.कर निर्धारक व संग्रा.यांच्या अभिप्रायानुसार आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (कर संकलन अधिकारी) यांचा अभिप्राय की,दि.२१/०६/२०२२ रोजीचा पंचनाम व विभागाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,चर्चा करा., चर्चा केली ,दिनांक ०७/०५/२०१८ च्या अर्जावर तत्कालीन वसुली लिपीक यांनी काय कार्यवाही केली? नियंत्रक अधिकारी यांनी काय कारवाई केली? व विलंबाबबत खुलाश्यासह फेरसादर करा.

यावर प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की,उपरोक्त विषयान्वये फेरसादर करण्यात येते की,१.वॉर्ड क्र.४ चे तत्कालीन वसुली लिपीक सन २०१८-१९ या आर्थिक वर्षा त सेवानिवृत्त झालेले असल्याने वॉर्ड क्र.७४ ला कोणीही वॉर्ड लिपिक / मदतनीस नसल्याने तो वॉर्ड रिमामाच होता.२. सन २०१९-२०२० व २०२०-२०२१ या आर्थिक वर्षात कोरोना काळात शासकीय कार्यालय बंद असल्याने कोणत्याही अर्जावर कामकाज झाले नाही.सदर कारणामुळे कार्यालयीन अहवाल सादर करण्यास विलंब झालेला आहे.३.सन २०२१-२०२२ पासुन सदरचा वॉर्ड क्र ७४ हा माझ्याकडे वसुली करीता सोपविण्यात आलेला आहे.सदरील व्याक्ती श्री.भाउसाहेब नामदेक कातोरे हे चौकशी करीता माझ्याकउे आलेले असताना त्यांनी दि.७/५/२०१८ चा अर्ज दाखविला त्यानुसार जुन्या अर्जावरून दि.७/१/२०२२ रोजी त्यांचेकडुन नवीन अर्ज घेवून कार्यालयीन प्रस्ताव सादर केलेला आहे.वरील प्रमाणे उपरोक्त अहवाल मंजुरीस्तव सविनय सादर.
यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,प्रस्तावित नुसार मान्य.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अर्जदार श्री.भाउसाहेब नामदेव कातोरे रा.नागापुर नागापुर उपविभाग,वॉर्ड क्र.७३ बिल क्र.१२६/१ मालमत्ता क्र.Z१७३३०३१२८७ सदर मिळकत अस्तीत्वात नसतांना आकारण्यात आलेली मालमत्ता कराची आकारणी रक्कम निर्लेखित करणे बाबत ऑफिस रिपोर्ट मंजुर.

मा.श्री.रविंद्र बारस्कर :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.सौ.मिना चव्हाण :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.सौ.रिता भाकरे :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अर्जदार श्री.भाउसाहेब नामदेव कातोरे रा.नागापुर नागापुर उपविभाग,वॉर्ड क्र.७३ बिल क्र.१२६/१ मालमत्ता क्र.Z१७३३०३१२८७ सदर मिळकत अस्तीत्वात नसतांना आकारण्यात आलेली मालमत्ता कराची आकारणी रक्कम निर्लेखित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अर्जदार श्री.भाउसाहेब नामदेव कातोरे रा.नागापुर नागापुर उपविभाग,वॉर्ड क्र.७३ बिल क्र.१२६/१ मालमत्ता क्र.Z१७३३०३१२८७ सदर मिळकत अस्तीत्वात नसतांना आकारण्यात आलेली मालमत्ता कराची आकारणी रक्कम निर्लेखित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजुर.

कायदेशीर व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.सौ.मिना चव्हाण सही/-

अनुमोदक :- मा.सौ. रिता भाकरे सही/-

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : १०**

**विषय क्रमांक : ११५** **दिनांक :- २१/११/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे झेंडीगेट येथील शाळा क्रमांक ४ मधिल सामाजिक सभागृह जागा दरमहा रक्कम रूपये १९०००/- अटी व शर्ती प्रमाणे ५ वर्षे कराराने सायमा मुजाहिद कुरेशी अध्यक्ष प्रबोधन फौंडेशन अहमदनगर यांना भाडेतत्वावर देणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुरः-** अहमदनगर महानगरपालिका मार्केट विभाग

उपरोक्त विषयान्वये विनंतीपुर्वक रिपोर्ट सादर करण्यात येतो की,अहमदनगर मनपाचे झेंडीगेट येथील शाळा क्र.४मधील नगररचना विभागाने प्रमाणित केलेली सामाजिक सभागृह पत्राशेड भाडे तत्वावर देणे बाबतची निविदा दैनिक महाराष्ट्र या वर्तमान पत्रात प्रसिध्द केली होती.सदर निविदा अर्जाची विक्री दि.११/०५/२०२२ ते २०/०५/२०२२ पर्यत होती.तसेच सदर निविदा बयाना रक्कम भरून घेवून दि.२३/०५/२०२२ रोजी दु.२.०० वाजेपर्यत निविदा अर्ज स्विकारण्याची मुदत होती.सदर मुदतीमध्ये खालील तक्त्यात दर्शविल्यानुसार निविदा प्राप्त झाल्या आहेत.

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव | मा.सहा.संचालक नगररचना यांनी प्रमाणित केलेले दरमहा भाडे | निविदाधारकाने निविदेत नमुद केलेले दरमहाभाडे | अनामत रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | श्री.वाहिद इब्राहिम कुरेशी | १८,८००(कराविरहित) | १९,९००/- | १,१२,८००/- |
| २ | श्री.महंमद नजिम अब्दुल जब्बार कुरेशी | १८,८००(कराविरहित) | १८,८००/- | १,१२,८००/ |
| ३ | सायमा मुजहिद कुरेशी | १८,८००(कराविरहित) | १९,०००/- | १,१२,८००/ |

वरील विषयांकीत सामाजिक सभागृह पत्राशेड करिता मुदतीत तीन निविदा अर्ज प्राप्त झाले आहेत.त्यापैकी सायमा मुजाहिद कुरेशी,अहमदनगर या निविदाधारकांनी मा.सहाय्यक संचालक नगररचना मनपा यांनी प्रमाणित केलेल्या दरमहा भाडे रू.१८,८००/- (कराविरहीत) पेक्षा जास्त दरमहाभाडे रू १९,०००/-देण्याचे निविदा अर्जात नमुद केले आहे.

तरी सायमा मुजाहिद कुरेशी,अहमदनगर यांनी निविदा स्पर्धेत जास्तीत जास्त दरमहाभाडे रू.१९,०००/- व अनामत रक्कम रू.१,१२,८००/- देण्याचे नमुद केले आहे.त्यामुळे त्यांची निविदा मंजुर करणेस शिफारस आहे.तसेच अ.नगर मनपाचे झेंडीगेट येथील शाळा क्र.४ मधील नगररचना विभागाने प्रमाणित केलेली सामाजिक सभागृह पत्राशेडचे क्षेत्र २९७.६८ चौ.मी.इतके असुन त्याचे दरमहा भाडे रू.१९,०००/-(कराविरहीत) घेवून दर वर्षी वार्षिक १०%भाडे वाढीनुसार नेहमीच्या व निविदेच्या अटी व शर्ती नुसार तसेच अनामत रक्कम रू.१,१२,८००/- घेवून ५ वर्षे कराराने सायमा मुजाहिद कुरेशी,अध्यक्ष,प्रबोधन फौंडेशनअ.नगर यांस भाडयाने देणेकामी सदरचा प्रस्ताव निर्णयास्तव मा.स्थायी समिती पुढे सादर करणेस रिपोर्ट आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे मार्केट विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,"अ" प्रमाणे मान्यतेस

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,तपासणी करून सादर करा.

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की,कृपया संबंधितांनी राबविलेली निविदा प्रक्रिया अवलोकित करावी.

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की,प्रस्तावित मान्यतेस सादर.

यावर मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,अहमदनगर मनपाचे झेंडीगेट येथील शाळा क्र.४ मधील सामाजिक सभागृह जागा भाडेतत्वावर मिळणेबाबत सायमा मुजाहिद कुरेशी यांचे दरमहा भाडे रू.१९,०००/- (कराविरहीत) बाबत प्रस्तावित "अ" नुसार कार्यवाहीस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,१.भाडेनिश्चीती कशाचे आधारे करण्यात आली आहे?

२.जागा मनपास आवश्यकता आहे की नाही?३.आदिबाबत स्पष्ट करावे.

यावर मार्केट विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की,उपरोक्त संदर्भिय विषयान्वये विनंतीपुर्वक रिपोर्ट फेरसादर करण्यात येतो की,आपण आदेशीत केल्यानुसार अहवाल खालील प्रमाणे सादर करण्यात येत आहे.१.अहमदनगर मनपाचे झ ेंडीगेट येथील शाळा क्र.४ मधील सामाजिक सभागृह जागा भाडेतत्वावर देणे बाबत मा.सहाय्यक संचालक नगररचनाकार,मनपा यांनी नगररचना जा.क्र.४२९० दि.०८/०२/२०२२ अन्वये विषयांकीत जागेचे पत्राशेड क्षेत्र २९७.६८ चौ.मी.इतके असुन त्याचे दरमहा भाडे रू.१८,८००/- (कराविरहीत) तसेच सहा महिन्याचे भाडे इतकी अनामत रक्कम घेणे योग्य होईल असा अभिप्राय दिला आहे.त्यानुसार भाडे निश्चिती करण्यात आली आहे.२.निविदेतील अटी शर्तीमध्ये अट क्र.१९ महानगरपालिकेस शासकीय संस्थांना अत्यावश्यक सेवेकरीता (मनपाच्या मंजुरीने) आवश्यक असेल तेव्हा सदर कार्यालय विनामुल्य उपलब्ध करून दयावे लागेल असे नमुद आहे.

तरी सदरचा प्रस्ताव निर्णयास्तव मा.स्थायी समितीपुढे सादर करणेस रिपोर्ट आदेशार्थ सविनय सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,प्रस्तावित नुसार मान्य.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे झेंडीगेट येथील शाळा क्रमांक ४ मधिल सामाजिक सभागृह जागा दरमहा रक्कम रूपये १९०००/- अटी व शर्ती प्रमाणे ५ वर्षे कराराने सायमा मुजाहिद कुरेशी अध्यक्ष प्रबोधन फौंडेशन अहमदनगर यांना भाडेतत्वावर देणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

मा.श्री.समद खान :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.समद खान :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.श्री.रविंद्र बारस्कर :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे झेंडीगेट येथील शाळा क्रमांक ४ मधिल सामाजिक सभागृह जागा दरमहा रक्कम रूपये १९०००/- अटी व शर्ती प्रमाणे ५ वर्षे कराराने सायमा मुजाहिद कुरेशी अध्यक्ष प्रबोधन फौंडेशन अहमदनगर यांना भाडेतत्वावर देण्यास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजुर.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिकेचे झेंडीगेट येथील शाळा क्रमांक ४ मधिल सामाजिक सभागृह जागा दरमहा रक्कम रूपये १९०००/- अटी व शर्ती प्रमाणे ५ वर्षे कराराने सायमा मुजाहिद कुरेशी अध्यक्ष प्रबोधन फौंडेशन अहमदनगर यांना भाडेतत्वावर देण्यास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजुर.

कायदेशीर व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक : मा.श्री.समद खान सही/-

अनुमोदक :- मा.श्री.रविंद्र बारस्कर सही/-

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही/-<br>
सभापती<br>
स्थायी समिती<br>
अहमदनगर महानगरपालिका

## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
### मा.स्थायी समिती सभा क्रमांक : १०

**विषय क्रमांक : ११६** **दिनांक :- २१/११/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या फेर ई नि.क्र.८१९५६७ अहमदनगर महानगरपालिका सन २०२२-२३ करीता अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील गटर/ड्रेनेज/चेंबर दुरूस्ती कामाकरीता वार्षिक निविदा मंजुरी बाबत ऑफिस रिपोर्ट.(प्रभाग समिती क्र.१ करिता)

**प्रस्तावाचा मजकुर:-** अहमदनगर महानगरपालिका सार्व.बांधकाम विभाग

उपरोक्त विषयाबाबत खालील प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१.प्रशासकिय मान्यता :- मा.आयुक्त यांची दि.१९/०५/२०२२

२.ई - निविदा क्रमांक :- ८१९५६७ सन २०२२-२३

३.निविदा विक्री कालावधी :- दि.२०/०७/२०२२ ते २७/०७/२०२२

४.निविदा स्विकारणेची दिनांक :- दि.२०/०७/२०२२ ते २७/०७/२०२२

५.निविदा उघण्याचा दिनांक :- दि.२९/०७/२०२२

६.कामाची मुदत :- १२ महिने

७.प्राप्त झालेल्या निविदेचा तपशील :- दि.०२/०८/२०२२ रोजीच्या तांत्रिक छाननी नुसार.

| ई - निविदा क्रमांक | कामाचे नांव | निविदा रक्कम | निविदा दाखल करणारे ठेकेदार | निविदेमध्ये भरलेला दर(निविदा दरापेक्षा) | सर्वात कमी दराचे निविदाधारक व त्यांचा दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| फेर ई - निविदा क्र. ८१९५६७ सन २०२२-२०२३ | अहमदनगर महानगरपालिका सन २०२२-२३ करिता अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील गटर/ड्रेनेज/चेंबर दुरूस्ती कामाकरीता वार्षिक निविदा मंजुरी (प्रभाग समिती क्र.१ करिता) | १२,५०,०००/- | श्री.एच.जी.पठाण अहमदनगर | निविदा दराने | श्री.एच.जी.पठाण<br>---------------<br>निविदा दराने |

वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने स्पर्धात्मकदृष्या रकाना क्र.५ मध्ये नमुद निविदाधारक एच जी पठाण ,अ.नगर यांची निविदा निविदा दराने आलेली असुन ती सर्वात कमी दराची आहे.

तरी उक्त बाब विचारात घेवुन निविदाधारक एच.जी.पठाण अ.नगर यांची निविदा निविदा दराने मंजुरीस्तव सविनय सादर.तसेच मा.स्थायी समिती कडे मंजुरीस्तव सविनय सादर.

येणे प्रमाणे उप अभियंता यांचा अहवाल असे.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की,वरील अहवालानुसार निविदा दराची निविदा स्वीकारणेस हरकत नाही.तथापी आदेशार्थ सादर.

यावर मा.मुख्यलेखाधिककारी यांची स्वाक्षरी.

यावर मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,विभागाने प्रस्तावित केलेप्रमाणे "अ" नुसार कार्यवाहीस्तव सादर.

यावर मा.सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की,प्रस्तावित "अ" प्रमाणे मान्यतेस सादर.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचाअभिप्राय की,प्रस्तावित "अ" नुसार कार्यवाही करणेस मान्यतेस्तव सादर

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, "अ" नुसार मान्य

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेच्या फेर ई नि.क्र.८१९५६७ अहमदनगर महानगरपालिका सन २०२२-२३ करीता अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील गटर/ड्रेनेज/चेंबर दुरूस्ती कामाकरीता वार्षिक निविदा मंजुरी बाबत ऑफिस रिपोर्ट.(प्रभाग समिती क्र.१ करिता)

मा.श्री.रविंद्र बारस्कर :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.सभापती साहेब :- माहिती सांगा.

मा.शहर अभियंता श्री.इथापे :- प्रभाग समिती क्र.१,३ व ४ मधील किरकोळ स्वरूपाचे गटर दुरूस्ती ,चेंबर दुरूस्ती काही ठिकाणी पाईप टाकणे इ.छोटी मोठी काम असतात.वार्षीक दर मंजुरी करीता निविदा आहेत.

मा.श्री.गणेश कवडे :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.श्री.सचिन शिंदे :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेच्या फेर ई नि.क्र.८१९५६७ अहमदनगर महानगरपालिका सन २०२२-२३ करीता अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील गटर/ड्रेनेज/चेंबर दुरूस्ती कामाकरीता (प्रभाग समिती क्र.१ करिता) वार्षिक निविदा धारक एस.जी.पठाण,अ.नगर यांच्या निविदा दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजुर.विषय पत्रिकेतील विषय क्रमांक ११७ व ११८ हे प्रभाग समिती क्र.३ व ४ मधील किरकोळ स्वरूपाचे गटर दुरूस्ती ,चेंबर दुरूस्ती काही ठिकाणी पाईप टाकणे इ.कामाच्या असुन.वार्षीक दर मंजुरी करीता निविदा मंजुर करण्यात येत आहे. सदर काम तातडीचे असल्याने प्राधन्यक्रम यादीत समाविष्ठ न करता तातडीने देयक अदा करण्यात यावे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या फेर ई नि.क्र.८१९५६७ अहमदनगर महानगरपालिका सन २०२२-२३ करीता अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील गटर/ड्रेनेज/चेंबर दुरूस्ती कामाकरीता (प्रभाग समिती क्र.१ करिता) वार्षिक निविदा धारक एस.जी.पठाण,अ.नगर यांच्या निविदा दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे. सदर काम तातडीचे असल्याने प्राधन्यक्रम यादीत समाविष्ठ न करता तातडीने देयक अदा करण्यात यावे.ऑफिस रिपोर्ट मंजुर.खर्च मंजुर.

कायदेशीर व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.गणेश कवडे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.सचिन शिंदे सही/-

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : १०**

**विषय क्रमांक : ११७** **दिनांक :- २१/११/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या फेर ई नि.क्र.८१९६११अहमदनगर महानगरपालिका सन २०२२-२३ करीता अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील गटर/ड्रेनेज/चेंबर दुरूस्ती कामाकरीता वार्षिक निविदा मंजुरी बाबत ऑफिस रिपोर्ट.(प्रभाग समिती क्र.३ करिता)

**प्रस्तावाचा मजकुर:-** अहमदनगर महानगरपालिका सार्व.बांधकाम विभाग

उपरोक्त विषयाबाबत खालील प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१.प्रशासकिय मान्यता :- मा.आयुक्त यांची दि.१९/०५/२०२२

२.ई - निविदा क्रमांक :- ८१९६११ सन २०२२-२३

३.निविदा विक्री कालावधी :- दि.२०/०७/२०२२ ते २७/०७/२०२२

४.निविदा स्विकारणेची दिनांक :- दि.२०/०७/२०२२ ते २७/०७/२०२२

५.निविदा उघण्याचा दिनांक :- दि.२९/०७/२०२२

६.कामाची मुदत :- १२ महिने

७.प्राप्त झालेल्या निविदेचा तपशील :- दि.०२/०८/२०२२ रोजीच्या तांत्रिक छाननी नुसार.

| ई - निविदा क्रमांक | कामाचे नांव | निविदा रक्कम | निविदा दाखल करणारे ठेकेदार | निविदेमध्ये भरलेला दर(निविदा दरापेक्षा) | सर्वात कमी दराचे निविदाधारक व त्यांचा दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ८१९६११ | अहमदनगर महानगरपालिका सन २०२२-२३ करिता अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील गटर/ड्रेनेज/चेंबर दुरूस्ती कामाकरीता वार्षिक निविदा मंजुरी (प्रभाग समिती क्र.३ करिता) | १२,५०,०००/- | श्री.एच.जी.पठाण अहमदनगर | निविदा दराने | श्री.एच.जी.पठाण<br>---------------<br>निविदा दराने |

वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने स्पर्धात्मकदृष्या रकाना क्र.५ मध्ये नमुद निविदाधारक एच जी पठाण ,अ.नगर यांची निविदा निविदा दराने आलेली असुन ती सर्वात कमी दराची आहे.

तरी उक्त बाब विचारात घेवुन निविदाधारक एच.जी.पठाण अ.नगर यांची निविदा निविदा दराने मंजुरीस्तव सविनय सादर.तसेच मा.स्थायी समिती कडे मंजुरीस्तव पाठविणेस सादर.

येणे प्रमाणे उप अभियंता यांचा अहवाल असे.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की,वरील अहवालानुसार निविदा दराची निविदा स्वीकारणेस हरकत नाही.तथापी आदेशार्थ सादर.

यावर मा.मुख्यलेखाधिककारी यांची स्वाक्षरी.

यावर मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,विभागाने प्रस्तावित केलेप्रमाणे "अ" नुसार कार्यवाहीस्तव सादर.

यावर मा.सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की,प्रस्तावित "अ" प्रमाणे मान्यतेस सादर.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचाअभिप्राय की,प्रस्तावित "अ" नुसार कार्यवाही होणेस मान्यतेस्तव सादर

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, "अ" नुसार मान्य

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेच्या फेर ई नि.क्र.८१९६११अहमदनगर महानगरपालिका सन २०२२-२३ करीता अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील गटर/ड्रेनेज/चेंबर दुरूस्ती कामाकरीता वार्षिक निविदा मंजुरी बाबत ऑफिस रिपोर्ट.(प्रभाग समिती क्र.३ करिता)

मा.श्री.रविंद्र बारस्कर :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.सभापती साहेब :- माहिती सांगा.

मा.शहर अभियंता श्री.इथापे :- प्रभाग समिती क्र.१,३ व ४ मधील किरकोळ स्वरूपाचे गटर दुरूस्ती,चेंबर दुरूस्ती काही ठिकाणी पाईप टाकणे इ.छोटी मोठी काम असतात.वार्षीक दर मंजुरी करीता निविदा आहेत.

मा.श्री.गणेश कवडे :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.श्री.सचिन शिंदे :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेच्या फेर ई नि.क्र.८१९६११अहमदनगर महानगरपालिका सन २०२२-२३ करीता अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील गटर/ड्रेनेज/चेंबर दुरूस्ती कामाकरीता (प्रभाग समिती क्र.३ करिता) वार्षिक निविदा धारक एस.जी.पठाण,अ.नगर यांच्या निविदा दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे. विषय पत्रिकेतील विषय क्रमांक ११७ व ११८ हे प्रभाग समिती क्र.३ व ४ मधील किरकोळ स्वरूपाचे गटर दुरूस्ती ,चेंबर दुरूस्ती काही ठिकाणी पाईप टाकणे इ.कामाच्या असुन.वार्षीक दर मंजुरी करीता निविदा मंजुर करण्यात येत आहे. सदर काम तातडीचे असल्याने प्राधन्यक्रम यादीत समाविष्ठ न करता तातडीने देयक अदा करण्यात यावे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या फेर ई नि.क्र.८१९६११अहमदनगर महानगरपालिका सन २०२२-२३ करीता अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील गटर/ड्रेनेज/चेंबर दुरूस्ती कामाकरीता (प्रभाग समिती क्र.३ करिता) वार्षिक निविदा धारक एस.जी.पठाण,अ.नगर यांच्या निविदा दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे. सदर काम तातडीचे असल्याने प्राधन्यक्रम यादीत समाविष्ठ न करता तातडीने देयक अदा करण्यात यावे.ऑफिस रिपोर्ट मंजुर.खर्च मंजुर.

कायदेशीर व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.गणेश कवडे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.सचिन शिंदे सही/-

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : १०**

**विषय क्रमांक : ११८** **दिनांक :- २१/११/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या फेर ई नि.क्र.८१९६२३ अहमदनगर महानगरपालिका सन २०२२-२३ करीता अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील गटर/ड्रेनेज/चेंबर दुरूस्ती कामाकरीता वार्षिक निविदा मंजुरी बाबत ऑफिस रिपोर्ट.(प्रभाग समिती क्र.४ करिता)

**प्रस्तावाचा मजकुर:-** अहमदनगर महानगरपालिका सार्व.बांधकाम विभाग

उपरोक्त विषयाबाबत खालील प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१.प्रशासकिय मान्यता :- मा.आयुक्त यांची दि.१९/०५/२०२२

२.ई - निविदा क्रमांक :- ८१९५६७ सन २०२२-२३

३.निविदा विक्री कालावधी :- दि.२०/०७/२०२२ ते २७/०७/२०२२

४.निविदा स्विकारणेची दिनांक :- दि.२०/०७/२०२२ ते २७/०७/२०२२

५.निविदा उघण्याचा दिनांक :- दि.२९/०७/२०२२

६.कामाची मुदत :- १२ महिने

७.प्राप्त झालेल्या निविदेचा तपशील :- दि.२५/०८/२०२२ च्या तांत्रिक छानननीनुसार.

| ई - निविदा क्रमांक | कामाचे नांव | निविदा रक्कम | निविदा दाखल करणारे ठेकेदार | निविदेमध्ये भरलेला दर(निविदा दरापेक्षा) | सर्वात कमी दराचे निविदाधारक व त्यांचा दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| फेर ई निविदा क्र.८१९६२३ सन २०२२-२०२३ | अहमदनगर महानगरपालिका सन २०२२-२३ करिता अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील गटर/ड्रेनेज/चेंबर दुरूस्ती कामाकरीता वार्षिक निविदा मंजुरी (प्रभाग समिती क्र.४ करिता) | १२,५०,०००/- | श्री.निकेतन लोटके अ.नगर<br>---------------<br>श्री.नंदकिशोर गणपत धाडगे अ.नगर | निविदा दरापेक्षा ५% कमी दराने<br>---------------<br>निविदा दरापेक्षा ५०.५१०% कमी दराने | श्री.नंदकिशोर गणपत धाडगे अ.नगर<br>निविदा दरापेक्षा ५०.५१०% कमी दराने |

वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने स्पर्धात्मकदृष्या रकाना क्र.५ मध्ये नमुद निविदाधारक श्री.नंदकिशोर गणपत धाडगेअ.नगर यांची निविदा निविदा दरापेक्षा ५.५१०% कमी दराने आलेली असुन ती सर्वात कमी दराची आहे.

तरी उक्त बाब विचारात घेवुन निविदाधारक श्री.नंदकिशोर गणपत धाडगेअ.नगर यांची निविदा निविदा दरापेक्षा ५.५१०% कमी दराने मंजुरीस्तव सविनय सादर.सदर कमी दराची ई निविदा मान्यतेस्तव मा.स्थायी समिती कडेस पाठविणेस सादर.

येणे प्रमाणे उप अभियंता यांचा अहवाल असे.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की,विषयांकीत निविदा हि निविदा दरापेक्षा ५.५१०% कमी दराची निर्णयार्थ मा.स्थायी समितीकडेस सादर करणेस सादर.

यावर मा.मुख्यलेखाधिककारी यांची स्वाक्षरी.

यावर मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,विभागाने प्रस्तावित केलेप्रमाणे "अ" नुसार कार्यवाहीस्तव.
यावर मा.सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की,प्रस्तावित "अ" प्रमाणे मान्यतेस सादर.
यावर मा.उपायुक्त (सा) यांचाअभिप्राय की,प्रस्तावित "अ" नुसार मान्यतेस्तव सादर
यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, "अ" नुसार मान्य

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेच्या फेर ई नि.क्र.८१९६२३ अहमदनगर महानगरपालिका सन २०२२-२३ करीता अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील गटर/ड्रेनेज/चेंबर दुरूस्ती कामाकरीता वार्षिक निविदा मंजुरी बाबत ऑफिस रिपोर्ट.(प्रभाग समिती क्र.४ करिता)

मा.श्री.रविंद्र बारस्कर :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.सभापती साहेब :- माहिती सांगा.

मा.शहर अभियंता श्री.इथापे :- प्रभाग समिती क्र.१,३ व ४ मधील किरकोळ स्वरूपाचे गटर दुरूस्ती ,चेंबर दुरूस्ती काही ठिकाणी पाईप टाकणे इ.छोटी मोठी काम असतात.वार्षीक दर मंजुरी करीता निविदा आहेत.

मा.श्री.गणेश कवडे :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.श्री.सचिन शिंदे :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेच्या फेर ई नि.क्र.८१९६२३ अहमदनगर महानगरपालिका सन २०२२-२३ करीता अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील गटर/ड्रेनेज/चेंबर दुरूस्ती कामाकरीता (प्रभाग समिती क्र.४ करिता) वार्षिक निविदा धारक श्री.नंदकिशोर गणपत धाडगेअ.नगर यांच्या निविदा दरापेक्षा ५.५१०% कमी दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे. सदर काम तातडीचे असल्याने प्राधन्यक्रम यादीत समाविष्ठ न करता तातडीने देयक अदा यावे.ऑफिस रिपोर्ट मंजुर.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या फेर ई नि.क्र.८१९६२३ अहमदनगर महानगरपालिका सन २०२२-२३ करीता अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील गटर/ड्रेनेज/चेंबर दुरूस्ती कामाकरीता (प्रभाग समिती क्र.४ करिता) वार्षिक निविदा धारक श्री.नंदकिशोर गणपत धाडगेअ.नगर यांच्या निविदा दरापेक्षा ५.५१०% कमी दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे. सदर काम तातडीचे असल्याने प्राधन्यक्रम यादीत समाविष्ठ न करता तातडीने देयक अदा करण्यात यावे.ऑफिस रिपोर्ट मंजुर.खर्च मंजुर.

कायदेशीर व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.गणेश कवडे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.सचिन शिंदे सही/-

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : १०**

**विषय क्रमांक : ११९** **दिनांक :- २१/११/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.०७ मधील बोल्हेगांव भागातील गणेश चौक ते राघवेंद्र स्वामी मंदिर ते केशव कॉर्नर पर्यत रस्ता करणे "नविन रस्ता विकसित करणे सन २०२१-२०२२" अंतर्गत ई - निविदा क्रमांक ७८००९५ या निविदेच्या मंजुरीबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुरः-** अहमदनगर महानगरपालिका सार्व.बांधकाम विभाग

उपरोक्त विषयाबाबत खालील प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१.प्रशासकिय मान्यता :- मा.आयुक्त यांची दि.२७/०६/२०२२ रोजीची व मा.स्थायी समिती सभा क्र.११ विषय क्र.१९० दि.२७/०१/२०२२

२.ई - निविदा क्रमांक :- ७८००९५/ सन २०२२-२३ दि.१४/०३/२०२२

३.निविदा विक्री कालावधी :- दि.१४/०३/२०२२ ते ०७/०४/२०२२

४.निविदा स्विकारणेची दिनांक :- दि.१४/०३/२०२२ ते ०७/०४/२०२२

५.निविदा उघण्याचा दिनांक :- दि.११/०४/२०२२

६.कामाची मुदत :- ६ महिने

७.प्राप्त झालेल्या निविदेचा तपशील :- दि.३०/०५/२०२२ रोजीच्या मा.छाननी समितीचे शिफारशीनुसार.

| ई - निविदा क्रमांक | कामाचे नांव | निविदा रक्कम | निविदा दाखल करणारे ठेकेदार | निविदेमध्ये भरलेला दर(निविदा दरापेक्षा) | सर्वात कमी दराचे निविदाधारक व त्यांचा दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ७८००९५ | अहमदनगर मनपा हद्दीतील प्रभाग क्र.७ मधील बोल्हेगांव भागातील गणेश चौक ते राघवेंद्र स्वामी मंदिर ते केशव कॉर्नर पर्यत रस्ता करणे | ३,८९,०१,८२४/- | बेस्ट कंन्स्ट्रक्शन कंपनी अहमदनगर | निविदा दरापेक्षा १०.००% जादा दराने | बेस्ट कंन्स्ट्रक्शन कंपनी अहमदनगर<br>--------------<br>निविदा दरापेक्षा १०.००% जादा दराने |

वरील रकाना क्र.६ मध्ये नमुद निविदाधारक मे.बेस्ट कंन्स्ट्रक्शन कंपनी,अहमदनगर यांनी सदरची निविदा निविदा दरापेक्षा १०.००%जादा दराने आलेली आहे.सदरची निविदा सर्वात कमी दराची आहे.तथापि सदर कामाचे अंदाजपत्रक सन २०२१-२२ चे दरसुचीनुसार तयार करण्यात आलेले असल्याने जादा दराची निविदा मंजूर करणे उचित नाही.त्यामुळे कमी दराने निविदाधारकास वाटाघाटीसाठी बोलाविणे योग्य आहे.

तरी मे.बेस्ट कंन्स्ट्रक्शन कंपनी,अहमदनगर यांना निविदा दराच्या वाटाघाटीसाठी बोलविणेस मा.आयुक्त यांची दि.९/६/२०२२ रोजीच्या मंजुरीने ठेकेदार मे.बेस्ट कंन्स्ट्रक्शन कंपनी,अहमदनगर यांना इकडील जा.क्र.५९२ दि.१०/०६/२०२२ रोजी पत्र देवून मा.आयुक्त यांचे दालनात दि.१४/०६/२०२२ रोजी सकाळी ११.३० वाजता निविदा दराच्या वाटाघाटीसाठी उपस्थित राहणेस कळविले असता त्यांनी दि.१४/०६/२०२२ रोजी लेखी पत्र देवून सन २०२०-२१ च्या डी.एस.आर.नुसार प्रचलीत मार्केट दरामध्ये तुलना करता आमचे दर हे योग्य म्हणजे निविदा दरापेक्षा १०.००% जादा दर हे योग्य दिले आहेत तथापि मा.छाननी समितीने सदरचे काम निविदा दराने करणेबाबत शिफारस केली आहे.

तरी मा.छाननी समितीने निविदा दराने शिफारस केलेली आहे.व मे.बेस्ट कंन्स्ट्रक्शन कंपनी,अहमदनगर यांनी निविदा दरापेक्षा १०.००% जादा दराने काम करणेचे अंतिम दर कळविले आहेत.त्यानुसार मे.बेस्ट कंन्स्ट्रक्शन

कंपनी.अहमदनगर यांची विषयांकित कामाची निविदा दरापेक्षा १०.००% जादा दराची निविदा निर्णयास्तव तथा अवलोकनार्थ ऑफिस रिपोर्ट सविनय सादर.

येणे प्रमाणे उप अभियंता यांचा अहवाल असे.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की,छाननी समितीचे शिफारसीसह निविदाधारकाचे वाढीव दराबाबत निर्णयार्थ सादर.

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राया की,छाननी समितीने शिफारस केलेल्या दराप्रमाणे मान्यतेस सादर.

यावर मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,दिनांक १४/६/२२ च्या छाननी समितीच्या शिफारसी नुसार कार्यवाहीस्तव सादर.

यावर मा.सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की, की,दि.१४/६/२०२२ च्या छाननी समितीच्या शिफारसी नुसार मान्यतेस सादर.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचाअभिप्राय की, छाननी समितीच्या शिफारसीनुसार मान्यतेस्तेव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,स्वयंस्पष्ट निविदे च्या दरा बाबत अभिप्राय सादर करणे

यावर उप अभियंता यांचा अभिप्राय की,मा.फेरसादर,- अंदाजपत्रक हे सन २१-२२ चे दर सुची नुसार म्हणजे चालू दर सुची ने केलेली आहे.

- मा.छाननी समितीने निविदा निविदा दराने मंजुर करणेस शिफारस केलेली आहे.त्या नुसार मा.स्थायी समिती कडे निर्णयास्तव येणे प्रमाणे रिपोर्ट सादर.

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की,छाननी समितीने शिफारस केल्याप्रमाणे मान्यतेस सादर.

यावर मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,शहर अभियंता यांचे अभिप्रायनुसार मान्यतेस्तव सादर.छाननी समिती - निविदा दराने.

यावर मा.उपायुक्त यांचा अभिप्राय की,प्रस्तावित केल्यानुसार छाननी समितीच्या शिफारस केल्यानुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

यावर शाखा अभियंता यांचा अभिप्राय की,मा.फेरसादर,प्रस्तावित ई निविदा क्र.७८००९५/सन २०२१-२२ हि प्रसिध्द नुसार व तांत्रिक लिफाफा योग्यतेनुसार मे.बेस्ट कंन्स्ट्रक्शन अ.नगर यांची निविदा ,निविदादराच्या १०%जादा दराने प्राप्त होती.दर अवाजवी असल्याने वाटाघाटी साठी छाननीसमिती समोर बोलविले असता छाननी समितीने निविदादराने शिफारस केली व त्यानुसार मा.आयुक्त यांचे मान्यतेने प्रस्ताव मा.स्थायी समिती कडे जा.क्र.१०१० दि.१५/७/२२ अन्वये निर्णयासाठी पाठविला.

परंतु त्यामध्ये ठेकेदाराने निविदादराने काम करण्यास असमर्थता दर्शविली आहे.व सदरची निविदा देखील प्रथम मागणी आहे.दरम्यान मा.स्थायी समितीने सदरचा प्रस्ताव विना निर्णय जा.क्र.६७ /२१/७/२२ प्रत्यक्ष प्राप्त दि.४/८/२२ नुसार पाठविला आहे.

येणे प्रमाणे रिपोर्ट अवलोकनार्थ तथा आदेशार्थ सविनय सादर.

यावर शहर अभियांता यांची स्वाक्षरी.

यावर मा.उपायुक्त यांचा अभिप्राय की,प्रस्तावित "अ" नुसार आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,फेरनिविदा करावी.

यावर बांधकाम विभाग यांची टिप्पणी,उपरोक्त संदर्भिय विषयान्वये विनंती रिपोर्ट की,खालील विकास कामास नविन रस्ते विकसित करणे सन २०२१-२०२२ अन्वये मा.स्थायी समिती सभा क्र.११ विषय क्र.१९०

दि.२७/०१/२०२२ व मा.आयुक्त ,अहमदनगर महानगरपालिका यांची दि.३१/०१/२०२२ रोजीचे प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे.त्यानुसार सदर विकास कामाची फेर ई - निविदा प्रसिध्द करणे प्रस्तावित आहे.

| अ.क्र. | कामाचा तपशिल | प्रशासकिय मान्यता रक्कम |
|---|---|---|
| १ | फेर ई - निविदा क्र.१ /७८००६२ अहमदनगर मनपा हद्दीतील प्रभाग क्र.१६ मधील भैरवनाथ पतसंस्था ते पाच गोडावून पर्यत रस्ता करणे | ३,२४,५१,३९३/- |
| २ | फेर ई - निविदा क्र.१ /७८००९५अहमदनगर मनपा हद्दीतील प्रभाग क्र.७मधील बोल्हेगांव भागातील गणेश चौक ते राघवेंद्र स्वामी मंदिर ते केशव कॉर्नर पर्य त रस्ता करणे (दि.१८/८/२२ रोजी फेरनिविदेस मा.आयुक्त यांची मान्यता) | ४,४५,४२,५९०/- |
| | | ७,६९,९३,९८३/- |

त्यानुसार वरील कामाची फेर ई निविदा क्र.७८००६२ व ७८००९५ दि.१४/०३/२०२२ रोजी मनपाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली होती

| Sr.No | Envelopes | Start Date &Time | Expiry Dste & Time |
|---|---|---|---|
| १ | निविदा विक्री व तयार करणे | १४-०३-२०२२ १७:४५ | |
| २ | निविदा स्विकृती | १४-०३-२०२२ १७:४५ | |
| ३ | निविदा पुर्व बैठक | २१-०३-२०२२ १२:०० पासुन | |
| ४ | तांत्रिक व व्यापारी लिफाफा उघडणे | ११-०४-२०२२ ११:०५ पासुन | |

परंतु दि.११/०४/२०२२ रोजी विषयांकित फेर ई निविदा क्र.७८००६२ व ७८००९५ मध्ये एक निविदा प्राप्त झाली आहे.प्राप्त निविदाधारक मे.बेस्ट कन्स्ट्रक्शन कंपनी अहमदनगर यांनी सदरची निविदा ,निविदा दरापेक्षा १०.००%जादा दराने आलेली होती.सदरची निविदा सर्वात कमी दराची असल्याने व सदर कामाचे
अंदाजपत्रक सन २०२१-२२ चे दरसुचीनुसार तयार करण्यात आलेले असत्याने जादा दराची निविदा मंजुर करणे उचित नाही,त्यामुळे कमी दराचे निविदाधारक वाटाघाटीसाठी मा.आयुक्त यांचे दि.०९/०६/२०२२ रोजीच्या मंजुरीने ठेकेदार मे.बेस्ट कंन्स्ट्रक्शन कंपनी, अहमदनगर यांना इकडील जा.क्र.५९२ दि.१०/०६/२०२२ रोजी पत्र देवून मा.उपायुक्त यांचे दालनात दि.१४/०६/२०२२ रोजी सकाळी ११.३० वाजता निविदा दराच्या वाटाघाटीसाठी उपस्थित राहणेस कळविले असता त्यांनी दि.१४/०६/२०२२ रोजी लेखी पत्र देवून सन २०२०-२१ च्या डी.एस.आर.नुसार प्रचलीत मार्केट दरामध्ये तुलना करता आमचे दर हे योग्य म्हणजे निविदा दरापेक्षा १०.००%जादा दर हे योग्य दिले आहेत.तथापि मा.छाननी समितीने सदरचे काम निविदा दराने करणे बाबत शिफारस केलेनुसार मे.बेस्ट कंन्स्ट्रक्शन कंपनी.अहमदनगर यांनी निविदा दरापेक्षा १०.००%जादा दराने काम करणेचे अंतिम दर कळविले आहेत सदरचे दर हे अवाजवी वाटत असल्याने मा.आयुक्त यांचे मंजुरीने सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे जा.क्र.१०१० दि.१५०७/२०२२ अन्वये निर्णयासाठी पाठविला असता परंतु त्यामध्ये संबंधीत निविदाधारक मे.बेस्ट कंन्स्ट्रक्शन कंपनी ,अहमदनगर यांनी असमर्थता दर्शविली आहे.दरम्यान मा.स्थायी समितीने सदरचा प्रस्ताव विना निर्णय दि.२१/०७/२०२२ प्रत्यक्ष प्राप्त दि.०४/०८/२०२२ नुसार पाठविला आहे.सदरचा प्रस्ताव मा.आयुक्त यांचे
अवलोकनार्थ तथा निर्णयास्तव सादर केला असता मा.आयुक्त यांनी दि.१८/०८/२०२२ रोजी फेरनिविदा करावी असे आदेशित केलेले आहे.

वरील कामांची प्रशासकीय मान्यता रक्कम रू.३,२४,५१,३९३/- व ४,४५,४२,५९०/-या कामास तांत्रिक मान्यता सन २०२१-२२ च्या दरसूचीनुसार आहे व दि.२३/०७/२०२२ पासून ESSR-२०२२-२३ नुसार दर लागू आहेत. त्यामुळे ठेकेदार जादा दराने निविदा भरत आहे.सर्वसाधारण १५ ते २०% दर वाढले आहेत.त्यामुळे प्रशासकीय मान्यता रकमेपेक्षा जादा खर्च होवू नये या करीता त्याच रकमेत सुधारीत तांत्रिक मान्यता घेवून निविदा काढल्यास निविदा जादा दराने होणार नाही फक्त रस्त्यांची काही प्रमाणात लांबीपैकी रूंदी कमी करावी लागेल अन्यथा जादा दराने निविदा आल्यास प्रशासकीय मान्यता रकमेपेक्षा जादा रक्कम मनपा फंडातुन घ्यावी लागेल याबाबत आदेश होणेस सादर.

तरी विषयांकित दोन्ही कामांची तरी सोबत जोडलेली जाहीर ई निविद नोटीस मनपाच्या mahatenders.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करणेस व सर्व ठेकेदारांना माहिती होणेसाठी सदर जाहिर निविदेची सुचना शासन निर्णय दि.२७/०९/२०१८ नुसार म्हणजे एक मराठी जिल्हास्तर,राज्यस्तरीय मराठी एक व इंग्रजी एक असे वर्तमान पत्रात प्रसिध्द करणेस व याकामी येणा-या तद्नुषंगीक खर्चास मान्यता मिळणेस्तव ऑफिस रिपोर्ट सविनय सादर.

येणे प्रमाणे उप अभियंता श्री.निंबाळकर व श्री.पारखे यांचा अहवाल असे.

यावर मा.शहर अभियंता यांची स्वाक्षरी.

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की,मा.आयुक्त यांचे निर्देशानुसार कार्यवाही मान्यतेस सादर.

यावर मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,विभागाने प्रस्तावित केल्याप्रमाणे "अ" नुसार कार्यवाहीस्तव सादर.

यावर मा.सहा.आयुक्त यांचा अभिप्राय की,प्रस्तावित "अ" प्रमाणे मान्यतेस सादर.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की,प्रस्तावित "अ" "ब" "क" व "ड " नुसार आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,१. CAFO निधी उपलब्ध आहे का? २.सन २०२१-२२ चा मनपा निधी २२-२३ आर्थिक वर्षात वापरता येईल का?याची खात्री करावी. ३.मनपा आर्थिक परिस्थितीचे अवलोकन करावे व त्या अन्वये सादर करावे.

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की,सदर प्रकरणी सादर करण्यात येते की,मे बेस्ट कंन्स्ट्रक्शन यांनी अंदाजपत्रीत दराने काम करण्यास तयार असलेचे कळविले आहे.

सबब बांधकाम विभागाकडून विहीत मार्गाने प्रस्ताव सक्षम समितीपुढे सादर करणे बाबत मान्यतेस सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,"अ" नुसार कार्यवाहीस्तव मान्य.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.०७ मधील बोल्हेगांव भागातील गणेश चौक ते राघवेंद्र स्वामी मंदिर ते केशव कॉर्नर पर्यत रस्ता करणे "नविन रस्ता विकसित करणे सन २०२१-२०२२" अंतर्गत ई - निविदा क्रमांक ७८००९५ या निविदेच्या मंजुरीबाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.रविंद्र बारस्कर :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.सभापती साहेब :-या विषया बाबत माहिती सांगा.

शहर अभियंता श्री.इथापे :- प्रभाग क्रमांक ७ बोल्हेगांव भागातीलश्री.गणेश चौक ते केशव कॉर्नर या ठिकाणी रस्ता करणे आहे.हा अत्यंत रहदारीचा रस्ता असुन या ठिकाणी काळी माती असल्याने व मोठया प्रमाणात झालेल्या पावसामुळे या रस्त्याची दुरावस्था झाली आहे.हा रस्ता करणे अत्यंत आवश्यक असल्याने सभापती साहेब,आपण रस्त्याच्या कामासाठी नेहमीच पाठपुरावा केलेला आहे.सदरचा रस्ता मध्यंतरीच्या काळामध्ये दुरूस्त करण्यात आलेला होता.सदरचा रस्ता कॉंक्रीटीकरण असून दोन्ही बाजुने गटर करणे आवश्यक आहे.निविदा मागवून निविदा मंजुरीसाठी समिती समोर विषय ठेवण्यात आलेला आहे.

मा.सभापती साहेब :- सदर रस्त्यास छत्रपती शिवाजी महाराज मार्ग असे नामकरण करण्यात आलेले आहे.

मा.श्री.रविंद्र बारस्कर :- सावेडी नाका ते वैदुवाडी रस्ता अत्यंत खराब झालेला आहे.सदर मार्गावर मोठया प्रमाणावर वाहतुक असल्याने रस्ता दुरूस्ती होणे आवश्यक आहे.मी वरंवार पाठपुरावा करून देखील या रस्त्याचे काम करण्यात आलेले नाही.त्यामुळे महानगरपालिके विषयी नागरीकांमध्ये मोठया प्रमाणात असंतोष आहे.

मा.शहर अभियंता श्री.इथापे :- सावेडी नाक्याजवळ सदरचा रस्ता १३ मीटर रूंद आहे.परंतु प्रत्यक्षात तो ६ मिटरपेक्षा सुध्दा कमी आहे.१३ मिटर रस्ता अतिक्रमण काढून मोकळा करून मिळाला तर त्या ठिकाणी काम करता येईल.या ठिकाणचे अतिक्रमण काढून हा रस्ता करणे बाबत कार्यवाही चालू आहे.

मा.श्री.समद खान :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.सौ.मिना चव्हाण :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- सदरच्या रस्ता हा जास्त रहदारीचा असल्यामुळे पावसाळयात खराब झाला होता.त्याची अनेक वेळा पाहणी केली आहे.सदर रस्त्याचे काम करणारे ठेकेदार यांनी निविदा दरापेक्षा जास्त दराने टेंडर भरलेले होते. मी आमदार साहेब यांना समक्ष भेटून सदर रस्त्याच्या दुरावस्थेबाबत पाहाणी करणे बाबत विनंती केली.त्यानुसार मा.आमदार साहेब यांनी माझ्या विनंतीस मान देवून मा.आमदार साहेब संग्राम भैय्या जगताप यांनी सदर रस्त्याच्या दुरावस्थेची समक्ष पहाणी केली आहे.या रस्त्याबाबत झालेल्या चर्चे नुसार ठेकेदार संस्थेने सदर निविदा १० टक्के जादा दराने भरली होती.त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थीक नुकसान होत होते.ही बाब मा.आमदार साहेब यांच्या निदर्शनास आणुन दिल्यानंतर मा.आमदार साहेब व मा.उपमहापौर व मी चर्चा करून ठेकेदार यांना निविदा दराने काम करणे बाबत सांगण्यात आले.

मा.आमदार साहेब,मा.महापौर मॅडम ,मा.उपमहापौर साहेब ,मी व बेस्ट कंन्स्ट्रक्शन चे श्री.मेहेर यांच्या मध्ये झालेल्या चर्चे नुसार दिनांक १४/११/२०२२ रोजी लेखी पत्र देवून निविदा दराने काम करण्यास सहमती दर्शविल्याने सदरचा विषय तात्काळ मा.स्थायी समितीच्या सभेमध्ये घेवून मंजुरी करीता ठेवण्यात आला आहे.

मा.आमदार संग्रामभैय्या जगताप यांच्या प्रयत्नातुन या रस्त्याचे काम मार्गी लागले आहे.मा.स्थायी समितीच्या वतीने तसेच समस्त बोल्हेगांव ग्रामस्थांच्या वतीने मी त्यांचे आभार व्यक्त करतो.बोल्हेगांव भागातील शेतकरी,कामगार,महिला,वृध्द,शाळकरी विद्यार्थी यांच्यासाठी हा रस्ता अत्यंत गरजेचा आहे.नागरीकांच्या मागणी नुसार हा रस्ता करण्यात यावा.

अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.०७ मधील बोल्हेगांव भागातील गणेश चौक ते राघवेंद्र स्वामी मंदिर ते केशव कॉर्नर पर्यत रस्ता करणे "नविन रस्ता विकसित करणे सन २०२१-२०२२" अंतर्गत ई - निविदा क्रमांक ७८००९५ या निविदेचे निविदाकार बेस्ट कंन्स्ट्रक्शन यांच्या निविदा दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.

GST दरामध्ये झालेल्या दर वाढीमुळे होणा-या तफावती बाबत प्रशासनाने निर्णय घ्यावा. तसेच महानगरपालिकेच्या आर्थिक स्थीतीचा विचार करावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.०७ मधील बोल्हेगांव भागातील गणेश चौक ते राघवेंद्र स्वामी मंदिर ते केशव कॉर्नर पर्यत रस्ता करणे "नविन रस्ता विकसित करणे सन २०२१-२०२२" अंतर्गत ई - निविदा क्रमांक ७८००९५ या निविदेचे निविदाकार मे.बेस्ट कंन्स्ट्रक्शन यांच्या निविदा दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे. GST दरामध्ये झालेल्या दर वाढीमुळे रकमेमध्ये होणा-या तफावती बाबत महानगरपालिकेच्या आर्थिक स्थितीचा विचार करावा.तसेच मा.केंद्र शासनाच्या दिनांक २९/०६/२०२२ रोजी प्रमाणे वाढीव GST दराबाबत प्रशासनाने आपल्या स्तरावर निर्णय घ्यावा.ऑफिस रिपोर्ट मंजुर.खर्च मंजुर.

कायदेशिर व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.समद खान सही/-

अनुमोदक :- मा.सौ.मिना चव्हाण सही/-

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## मा.स्थायी समिती सभा क्रमांक : १०

**विषय क्रमांक : १२०** **दिनांक :- २१/११/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.१६ मधील भैरवनाथ पतसंस्था ते पाच गोडावून ते शाहूनगर बसस्टॉप पर्यत रस्ता करणे "नविन रस्ता विकसित करणे सन २०२१-२०२२" अंतर्गत ई - निविदा क्रमांक ७८००६२ या निविदेच्या मंजुरीबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर:-** अहमदनगर महानगरपालिका सार्व.बांधकाम विभाग

उपरोक्त विषयाबाबत खालील प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१.प्रशासकिय मान्यता :- मा.आयुक्त यांची दि.३१/०१/२०२२ रोजीची व मा.स्थायी समिती सभा क्र.११ विषय क्र.१९० दि.२७/०१/२०२२

२.ई - निविदा क्रमांक :- ७८००६२/ सन २०२२-२३ दि.१४/०३/२०२२

३.निविदा विक्री कालावधी :- दि.१४/०३/२०२२ ते ०७/०४/२०२२

४.निविदा स्विकारणेची दिनांक :- दि.१४/०३/२०२२ ते ०७/०४/२०२२

५.निविदा उघण्याचा दिनांक :- दि.११/०४/२०२२

६.कामाची मुदत :- ६ महिने

७.प्राप्त झालेल्या निविदेचा तपशील :- दि.३०/०५/२०२२ रोजीच्या मा.छाननी समितीचे शिफारशीनुसार.

| ई - निविदा क्रमांक | कामाचे नांव | निविदा रक्कम | निविदा दाखल करणारे ठेकेदार | निविदेमध्ये भरलेला दर(निविदा दरापेक्षा) | सर्वात कमी दराचे निविदाधारक व त्यांचा दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ७८००६२ | अहमदनगर मनपा हद्दीतील प्रभाग क्र.१६ मधील भैरवनाथ पतसंस्था ते पाच गोडावुन ते शाहुनगर बसस्टॉप पर्यत रस्ता करणे | २,८३,४१,८३४/- | बेस्ट कंन्स्ट्रक्शन कंपनी अहमदनगर | निविदा दरापेक्षा १०.००% जादा दराने | बेस्ट कंन्स्ट्रक्शन कंपनी अहमदनगर<br>---------------<br>निविदा दरापेक्षा १०.००% जादा दराने |

वरील रकाना क्र.६ मध्ये नमुद निविदाधारक मे.बेस्ट कंन्स्ट्रक्शन कंपनी,अहमदनगर यांनी सदरची निविदा निविदा दरापेक्षा १०.००%जादा दराने आलेली आहे.सदरची निविदा सर्वात कमी दराची आहे.तथापि सदर कामाचे अंदाजपत्रक सन २०२१-२२ चे दरसुचीनुसार तयार करण्यात आलेले असल्याने जादा दराची निविदा मंजूर करणे उचित नाही.त्यामुळे कमी दराने निविदाधारकास वाटाघाटीसाठी बोलाविणे योग्य आहे.

तरी मे.बेस्ट कंन्स्ट्रक्शन कंपनी,अहमदनगर यांना निविदा दराच्या वाटाघाटीसाठी बोलविणेस मा.आयुक्त यांची दि.९/६/२०२२ रोजीच्या मंजुरीने ठेकेदार मे.बेस्ट कंन्स्ट्रक्शन कंपनी,अहमदनगर यांना इकडील जा.क्र.५९२ दि.१०/०६/२०२२ रोजी पत्र देवून मा.आयुक्त यांचे दालनात दि.१४/०६/२०२२ रोजी सकाळी ११.३० वाजता निविदा दराच्या वाटाघाटीसाठी उपस्थित राहणेस कळविले असता त्यांनी दि.१४/०६/२०२२ रोजी

लेखी पत्र देवून सन २०२०-२१ च्या डी.एस.आर.नुसार प्रचलीत मार्केट दरामध्ये तुलना करता आमचे दर हे योग्य म्हणजे निविदा दरापेक्षा १०.००% जादा दर हे योग्य दिले आहेत तथापि मा.छाननी समितीने सदरचे काम निविदा दराने करणेबाबत शिफारस केली आहे.

तरी मा.छाननी समितीने निविदा दराने शिफारस केलेली आहे.व मे.बेस्ट कंन्स्ट्रक्शन कंपनी,अहमदनगर यांनी निविदा दरापेक्षा १०.००% जादा दराने काम करणेचे अंतिम दर कळविले आहेत.त्यानुसार मे.बेस्ट कंन्स्ट्रक्शन कंपनी.अहमदनगर यांची विषयांकित कामाची निविदा दरापेक्षा १०.००% जादा दराची निविदा निर्णयास्तव तथा अवलोकनार्थ ऑफिस रिपोर्ट सविनय सादर.

येणे प्रमाणे उप अभियंता यांचा अहवाल असे.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की,छाननी समितीचे शिफारसीसह निविदाधारकाचे जादा दराचे मागणी बाबत निर्णयार्थ सादर.

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राया की,छाननी समितीने शिफारस केल्याप्रमाणे मान्यतेस्तव सादर.

यावर मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,शहर अभियंता यांचे शिफारसीनुसार व मुलेअ अभिप्रायाप्रमाणे कार्यवाही करणे उचित राहिल.छाननी समिती शिफारसप्रमाणे मान्यतेस्तव सादर.

यावर मा.सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की, की,दि.१४/६/२०२२ च्या छाननी समिती शिफारस प्रमाणे मान्यतेस सादर.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचाअभिप्राय छाननी समितीच्या शिफारसीनुसार मान्यतेस्तेव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,स्वयंस्पष्ट निविदे च्या दरा बाबत अभिप्राय सादर करणे

यावर उप अभियंता यांचा अभिप्राय की,मा.फेरसादर,- अंदाजपत्रक हे सन २१-२२ चे दरसुचिनुसार म्हणजे चालू दर सुची ने केलेली आहे.

- मा.छाननी समितीने निविदा निविदा दराने मंजुर करणेस शिफारस केलेली आहे.त्या नुसार मा.स्थायी समिती कडे निर्णयास्तव येणे प्रमाणे रिपोर्ट सादर.

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की,छाननी समितीने शिफारस केल्याप्रमाणे मान्यतेस सादर.

यावर मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,शहर अभियंता यांचे शिफारसी नुसार कार्यवाहीस्तव सादर,छाननी समिती - निविदा दराने.

यावर मा.उपायुक्त यांचा अभिप्राय की,प्रस्तावित केल्यानुसार छाननी समितीच्या शिफारसीनुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

यावर शाखा अभियंता यांचा अभिप्राय की,मा.फेरसादर,प्रस्तावित ई निविदा क्र.७८००६२/सन २१-२२ हि प्रसिध्द नुसार व तांत्रिक लिफाफा योग्यतेनुसार मे.बेस्ट कंन्स्ट्रक्शन अ.नगर यांची निविदा ,निविदादराच्या १०%जादा दराने प्राप्त होती.दर अवाजवी असल्याने वाटाघाटी साठी छाननीसमिती समोर बोलविले असता छाननी समितीने निविदादराने शिफारस केली व त्यानुसार मा.आयुक्त यांचे मान्यतेने प्रस्ताव मा.स्थायी समिती जा.क्र.१०१२ दि.१५/७/२२ अन्वये निर्णयासाठी पाठविला.परंतु त्यामध्ये ठेकेदाराने निविदादराने काम करण्यास असमर्थता दर्शविली आहे.व सदरची निविदा देखील प्रथम मागणी आहे.दरम्यान मा.स्थायी समितीने सदरचा प्रस्ताव निर्णय जा.क्र.६६ /२१/७/२२ प्रत्यक्ष प्राप्त दि.४/८/२२ नुसार प्राप्त झाला आहे.

येणे प्रमाणे रिपोर्ट अवलोकनार्थ तथा आदेशार्थ सविनय सादर.

यावर शहर अभियांता यांची स्वाक्षरी.

यावर मा.उपायुक्त यांचा अभिप्राय की,प्रस्तावित नुसार आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,फेरनिविदा करावी.

यावर बांधकाम विभाग यांची टिप्पणी,उपरोक्त संदर्भिय विषयान्वये विनंती रिपोर्ट की,खालील विकास कामास नविन रस्ते विकसित करणे सन २०२१-२०२२ अन्वये मा.स्थायी समिती सभा क्र.११ विषय क्र.१९० दि.२७/०१/२०२२ व मा.आयुक्त ,अहमदनगर महानगरपालिका यांची दि.३१/०१/२०२२ रोजीचे प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे.त्यानुसार सदर विकास कामाची फेर ई - निविदा प्रसिध्द करणे प्रस्तावित आहे.

| अ.क्र. | कामाचा तपशिल | प्रशासकिय मान्यता रक्कम |
|---|---|---|
| १ | फेर ई - निविदा क्र.१ /७८००६२ अहमदनगर मनपा हद्दीतील प्रभाग क्र.१६ मधील भैरवनाथ पतसंस्था ते पाच गोडावून पर्यत रस्ता करणे | ३,२४,५१,३९३/- |
| २ | फेर ई - निविदा क्र.१ /७८००९५अहमदनगर मनपा हद्दीतील प्रभाग क्र.७मधील बोल्हेगांव भागातील गणेश चौक ते राघवेंद्र स्वामी मंदिर ते केशव कॉर्नर पर्य त रस्ता करणे (दि.१८/८/२२ रोजी फेरनिविदेस मा.आयुक्त यांची मान्यता) | ४,४५,४२,५९०/- |
| | | ७,६९,९३,९८३/- |

त्यानुसार वरील कामाची फेर ई निविदा क्र.७८००६२ व ७८००९५ दि.१४/०३/२०२२ रोजी मनपाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली होती

| Sr.No | Envelopes | Start Date &Time | Expiry Dste & Time |
|---|---|---|---|
| १ | निविदा विक्री व तयार करणे | १४-०३-२०२२ १७:४५ | |
| २ | निविदा स्विकृती | १४-०३-२०२२ १७:४५ | |
| ३ | निविदा पुर्व बैठक | २१-०३-२०२२ १२:०० पासुन | |
| ४ | तांत्रिक व व्यापारी लिफाफा उघडणे | ११-०४-२०२२ ११:०५ पासुन | |

परंतु दि.११/०४/२०२२ रोजी विषयांकित फेर ई निविदा क्र.७८००६२ व ७८००९५ मध्ये एक निविदा प्राप्त झाली आहे.प्राप्त निविदाधारक मे.बेस्ट कन्स्ट्रक्शन कंपनी अहमदनगर यांनी सदरची निविदा ,निविदा दरापेक्षा १०.००%जादा दराने आलेली होती.सदरची निविदा सर्वात कमी दराची असल्याने व सदर कामाचे अंदाजपत्रक सन २०२१-२२ चे दरसुचीनुसार तयार करण्यात आलेले असत्याने जादा दराची निविदा मंजुर करणे उचित नाही,त्यामुळे कमी दराचे निविदाधारक वाटाघाटीसाठी मा.आयुक्त यांचे दि.०९/०६/२०२२ रोजीच्या मंजुरीने ठेकेदार मे.बेस्ट कंन्स्ट्रक्शन कंपनी, अहमदनगर यांना इकडील जा.क्र.५९२ दि.१०/०६/२०२२ रोजी पत्र देवून मा.उपायुक्त यांचे दालनात दि.१४/०६/२०२२ रोजी सकाळी ११.३० वाजता निविदा दराच्या वाटाघाटीसाठी उपस्थित राहणेस कळविले असता त्यांनी दि.१४/०६/२०२२ रोजी लेखी पत्र देवून सन २०२०-२१ च्या डी.एस.आर.नुसार प्रचलीत मार्केट दरामध्ये तुलना करता आमचे दर हे योग्य म्हणजे निविदा दरापेक्षा १०.००%जादा दर हे योग्य दिले आहेत.तथापि मा.छाननी समितीने सदरचे काम निविदा दराने करणे बाबत शिफारस केलेनुसार मे.बेस्ट कंन्स्ट्रक्शन कंपनी.अहमदनगर यांनी निविदा दरापेक्षा १०.००%जादा दराने काम करणेचे अंतिम दर कळविले आहेत सदरचे दर हे अवाजवी वाटत असल्याने मा.आयुक्त यांचे मंजुरीने सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे जा.क्र.१०१० दि.१५०७/२०२२ अन्वये निर्णयासाठी पाठविला असता परंतु त्यामध्ये संबंधीत निविदाधारक मे.बेस्ट कंन्स्ट्रक्शन कंपनी ,अहमदनगर यांनी असमर्थता दर्शविली आहे.दरम्यान मा.स्थायी समितीने सदरचा प्रस्ताव विना निर्णय दि.२१/०७/२०२२ प्रत्यक्ष प्राप्त दि.०४/०८/२०२२ नुसार पाठविला आहे.सदरचा प्रस्ताव मा.आयुक्त यांचे अवलोकनार्थ तथा निर्णयास्तव सादर केला असता मा.आयुक्त यांनी दि.१८/०८/२०२२ रोजी फेरनिविदा करावी असे आदेशित केलेले आहे.

वरील कामांची प्रशासकीय मान्यता रक्कम रू.३,२४,५१,३९३/- व ४,४५,४२,५९०/-या कामास तांत्रिक मान्यता सन २०२१-२२ च्या दरसूचीनुसार आहे व दि.२३/०७/२०२२ पासून ESSR-२०२२-२३ नुसार दर लागू आहेत. त्यामुळे ठेकेदार जादा दराने निविदा भरत आहे.सर्वसाधारण १५ ते २०% दर वाढले आहेत.त्यामुळे प्रशासकीय मान्यता रकमेपेक्षा जादा खर्च होवू नये या करीता त्याच रकमेत सुधारीत तांत्रिक मान्यता घेवून निविदा काढल्यास निविदा जादा दराने होणार नाही फक्त रस्त्यांची काही प्रमाणात लांबीपैकी रूंदी कमी करावी लागेल अन्यथा जादा दराने निविद आल्यास प्रशासकीय मान्यता रकमेपेक्षा जादा रक्कम मनपा फंडातुन घ्यावी लागेल याबाबत आदेश होणेस सादर.

तरी विषयांकित दोन्ही कामांची तरी सोबत जोडलेली जाहीर ई निविद नोटीस मनपाच्या mahatenders.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करणेस व सर्व ठेकेदारांना माहिती होणेसाठी सदर जाहिर निविदेची सुचना शासन निर्णय दि.२७/०९/२०१८ नुसार म्हणजे एक मराठी जिल्हास्तर,राज्यस्तरीय मराठी एक व इंग्रजी एक असे वर्तमान पत्रात प्रसिध्द करणेस व याकामी येणा-या तद्नुषंगीक खर्चास मान्यता मिळणेस्तव ऑफिस रिपोर्ट सविनय सादर.

येणे प्रमाणे उप अभियंता श्री.निंबाळकर व श्री.पारखे यांचा अहवाल असे.

यावर मा.शहर अभियंता यांची स्वाक्षरी.

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की,मा.आयुक्त यांचे निर्देशानुसार कार्यवाही मान्यतेस सादर.

यावर मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,विभागाने प्रस्तावित केल्याप्रमाणे "अ" नुसार कार्यवाहीस्तव सादर.

यावर मा.सहा.आयुक्त यांचा अभिप्राय की,प्रस्तावित "अ" प्रमाणे मान्यतेस सादर.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की,प्रस्तावित "अ" "ब" "क" व "ड " नुसार आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,१. CAFO निधी उपलब्ध आहे का? २.सन २०२१-२२ चा मनपा निधी २२-२३ आर्थिक वर्षात वापरता येईल का?याची खात्री करावी. ३.मनपा आर्थिक परिस्थितीचे अवलोकन करावे व त्या अन्वये सादर करावे.

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की,सदर प्रकरणी सादर करण्यात येते की,मे बेस्ट कंन्स्ट्रक्शन यांनी अंदाजपत्रीत दराने काम करण्यास तयार असलेचे कळविले आहे.

सबब बांधकाम विभागाकडून विहीत मार्गाने प्रस्ताव सक्षम समितीपुढे सादर करणे बाबत मान्यतेस सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,"अ" नुसार कार्यवाहीस्तव मान्य.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.१६ मधील भैरवनाथ पतसंस्था ते पाच गोडावून ते शाहूनगर बसस्टॉप पर्यत रस्ता करणे "नविन रस्ता विकसित करणे सन २०२१-२०२२" अंतर्गत ई - निविदा क्रमांक ७८००६२ या निविदेच्या मंजुरीबाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.रविंद्र बारस्कर :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.सभापती साहेब :- माहिती सांगा.

शहर अभियंता श्री.इथापे : - केडगांव प्रभागाती भैरवनाथ पतसंस्था ते शहुनगर बसस्टॉप पर्यत रस्ता विकसीत करणे आहे.सदरच्या रस्त्यावर महानगरपालिकेची बस सेवा चालू आहे.पावसामुळे रस्ता खराब झालेला

असल्याने रस्त्याचे काम करणे आवश्यक आहे.निविदा मंजुरी कामी मा.स्थायी समिती समोर विषय ठेवण्यात आलेला आहे.

मा.श्री.समद खान :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.सौ.मिना चव्हाण :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.१६ मधील भैरवनाथ पतसंस्था ते पाच गोडावून ते शाहूनगर बसस्टॉप पर्यत रस्ता करणे "नविन रस्ता विकसित करणे सन २०२१-२०२२" अंतर्गत ई - निविदा क्रमांक ७८००६२ या निविदेचे निविदाकार मे.बेस्ट कंन्स्ट्रक्शन यांच्या निविदा दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे. GST दरामध्ये झालेल्या दर वाढीमुळे रकमेमध्ये होणा-या तफावती बाबत महानगरपालिकेच्या आर्थिक स्थितीचा विचार करावा.तसेच मा.केंद्र शासनाच्या दिनांक २९/०६/२०२२ रोजी प्रमाणे वाढीव GST दराबाबत प्रशासनाने आपल्या स्तरावर निर्णय घ्यावा.ऑफिस रिपोर्ट मंजुर

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.१६ मधील भैरवनाथ पतसंस्था ते पाच गोडावून ते शाहूनगर बसस्टॉप पर्यत रस्ता करणे "नविन रस्ता विकसित करणे सन २०२१-२०२२" अंतर्गत ई - निविदा क्रमांक ७८००६२ या निविदेचे निविदाकार मे.बेस्ट कंन्स्ट्रक्शन यांच्या निविदा दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे. GST दरामध्ये झालेल्या दर वाढीमुळे रकमेमध्ये होणा-या तफावती बाबत महानगरपालिकेच्या आर्थिक स्थितीचा विचार करावा.तसेच मा.केंद्र शासनाच्या दिनांक २९/०६/२०२२ रोजी प्रमाणे वाढीव GST दराबाबत प्रशासनाने आपल्या स्तरावर निर्णय घ्यावा.ऑफिस रिपोर्ट मंजुर.खर्च मंजुर.

कायदेशिर व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.समद खान सही/-

अनुमोदक :- मा.सौ.मिना चव्हाण सही/-

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## मा.स्थायी समिती सभा क्रमांक : १०

**विषय क्रमांक : १२१** **दिनांक :- २१/११/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीमधील प्रभाग समिती कार्यालय १ ते ४ करीता नालेसफाई व रस्ते सफाई कामी बाह्ययंत्रणेमार्फत कामगार/मजुर उपलब्ध करून घेणेकामी दर निश्चीतीनुसार खाजगी संस्थेची नेमणूक करणे कामी दराची जाहीर ई - निविदा सुचना क्र.०१ सन २०२२-२३ (T.ID२०२२ ANMC८०६४५१-१) मधील प्राप्त दरास प्रशासनाने केलेल्या मंजुर दरास व येणा-या खर्चास मान्यता मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुरः-** अहमदनगर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभाग

संदर्भ :- आकांक्षा एन्टरप्रायजेस,अहमदनगर यांचे दि.२१/०९/२०२२ चे दराबाबतचे पत्र.

उपरोक्त संदर्भाकीत विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की,उपरोक्त संदर्भाकीत विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की,महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती क्र.१ ते ४ साठी नालेसफाई व रस्ते सफाई कामी बाह्ययंत्रणेमार्फत कामगार/मजुर उपलब्ध करून घेणे कामी दर निश्चीतीनुसार खाजगी संस्थेची नियुक्ती करणेकामी प्रति दिवस प्रती मजुर दर निश्चीतीनुसार देय दराची जाहीर ई निविदा क्र.१ सन२०२२-२३ (T.ID२०२२ ANMC८०६४५१-१ दि.०८/०७/२०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

त्यानुसार सदरील दि.०८/०७/२०२२ रोजी तांत्रिक छाननी समितीची बैठक बोलावली असता मे.स्वामी सर्व्हीसेस या संस्थेस काळया यादीमध्ये समावेश केला असल्याचे ठराव निदर्शनास आले.त्यानुसार सदर संस्थेस अपात्र ठरवून उर्वरीत तीन संस्थांचे व्यापारी लिफाफे उघडणेकामी शिफारस केली आहे.सदर शिफारशिनुसार दि.२१/०७/२०२२ रोजी प्राप्त तीन संस्थांचे व्यापारी लिफाफे उघडले असता मे.आकांक्षा एन्टरप्रायजेस,अहमदनगर यांचे दर सर्वात कमी आलेले आहेत.त्याअनुषंगाने आकांक्षा एन्टरप्रायजेस यांनी संदर्भाकीत पत्र देवून त्यासोबत दराबाबत सविस्तर विवरण दिलेले आहे.ते खालील प्रमाणे आहे.

१.किमान वेतन :- रू.४४२.३०/-
२.विशेष भत्ता :- रू.२५६/-
३.एकुण रक्कमेवर =६९८/-
४.भविष्य निर्वाह निधी १३%रक्कम रूपये ९१/-
५.ESIC ४%:- रू.२८/-
६.व्यवसाय कर :-२% रू.१४/-
७.संस्थेचा सर्व्हिस चार्ज ५%:- रू.३५/-
८.एकुण रक्कम रू.८६६/-
९.सेवा व वस्तु कर १८%:- १५६/-

एकुण दर रक्कम रू.१०५२ प्रति दिवस प्रति मजुर जर वस्तु व सेवा कर लागु नसेल तर ५% सर्व्हिस चार्ज सहित रू.८६६/- प्रती दिवस प्रती मजुर या प्रमाणे दर मान्य करावे आणि वस्तु व सेवा कर लागु असेल तर वस्तु व सेवा कर दयावा लागेल.त्याप्रमाणे दर रक्कम रू.१०५२/- प्रति दिवस प्रती मजुर असे पत्र सादर केलेले आहे.त्यानुसार मा.छाननी समिती समोर झालेल्या चर्चेनुसार निविदाकार संस्थेस रू.८५३/- प्रति दिन प्रति मजुर दर निश्चीत करून संस्थेस मान्य असलेबाबत पत्र सादर करणेबाबत पत्र देण्यात आले होते.त्याअनुषंगाने सदर संस्थेने रक्कम रू.८५३/- दर मंजुर असलेबाबत पत्र दिलेले होते.त्याअनुषंगाने प्रस्ताव सादर केला असता

मा.आयुक्त साहेब यांनी छाननी समितीच्या अभिप्रायासह सादर करावे असा अभिप्राय दिलेला आहे.त्याप्रमाणे दि.१५-०९-२०२२ रोजी छाननी समितीसमोर ठेवला असता मा.छाननी समितीने पुनश्चः दराबाबत अवलोकन केले असता सदर दर किमान वेतन रू.४४२/-विशेष भत्ता रू.२५६/- एकुण रू.६९८/- त्यावर ई.एस.आय.सी.४%प्रमाणे रू.२८/- व संस्थेचा सर्व्हिस चार्ज १%प्रमाणे रू.७ असा एकुण दर रक्कम रूपये ७३३/- प्रति मजुर प्रति दिन निश्चीत करण्यात आला आहे.त्याप्रमाणे मे.आकांक्षा एन्टरप्रायजेस यांना दर मंजुर असलेबाबतचे पत्र सादर करणेबाबत पत्र दिले असता सदर संस्थेने निश्चीत केलेले रक्कम रू.७३३/- प्रति मजुर प्रति दिन हे मान्य असलेबाबतचे पत्र सादर केलेले आहे.

तरी सदर पत्राप्रमाणे रक्कम रू.७३३/- प्रति मजुर प्रति दिन याप्रमाणे दरास मंजुरीस्तव मा.स्थायी समितीपुढे सादर करणेस आदेशार्थ प्रस्ताव सविनय सादर.

येणे प्रमाणे स्वच्छता निरीक्षक,मुख्य स्वच्छता निरीक्षक व घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यार मा.उपायुक्त (कर ) यांचा अभिप्राय की,मुलेप/मुलेअ

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की,प्रस्तावित मान्यतेस सादर.

यावर मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,छाननी समितीच्या शिफारशीनुसार तसेच विभागाने प्रस्तावित केलेप्रमाणे "अ" प्रमाणे कार्यवाहीस्तव

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,सन २२-२३ करिता दर मान्यतेस सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,प्रस्तावित नुसार मान्य.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका हद्दीमधील प्रभाग समिती कार्यालय १ ते ४ करीता नालेसफाई व रस्ते सफाई कामी बाह्ययंत्रणेमार्फत कामगार/मजुर उपलब्ध करून घेणेकामी दर निश्चीतीनुसार खाजगी संस्थेची नेमणूक करणे कामी दराची जाहीर ई - निविदा सुचना क्र.०१ सन २०२२-२३ (T.ID२०२२ ANMC८०६४५१-१) मधील प्राप्त दरास प्रशासनाने केलेल्या मंजुर दरास व येणा-या खर्चास मान्यता मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.सभापती साहेब :- विभाग प्रमुख माहिती सांगा.

घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख श्री.डॉ.शेडाळे :- घनकचरा विभागामार्फत बाहययंत्रणेव्दारे काम करून घेणे करीता निविदा मागविण्यात आलेलेली होती.चार निविदा प्राप्त झालेल्या होत्या,एका निविदा धारकास काळया यादीत टाकलेले असल्याने तीन निविदा उघडण्यात आल्या त्यापैकी आकांक्षा एन्टरप्रायजेस यांचे दर सर्वात कमी असल्याने निविदा मंजुरी करता मा.स्थायी समिती पुढे सादर करण्यात आलेली आहे.

मा.श्री.सचिन शिंदे :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.श्री.रविंद्र बारस्कर:- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका हद्दीमधील प्रभाग समिती कार्यालय १ ते ४ करीता नालेसफाई व रस्ते सफाई कामी बाह्ययंत्रणेमार्फत कामगार/मजुर उपलब्ध करून घेणेकामी दर निश्चीतीनुसार खाजगी संस्थेची नेमणूक करणे कामी दराची जाहीर ई - निविदा सुचना क्र.०१ सन २०२२-२३ (T.ID२०२२ ANMC-८०६४५१-१) मधील मे.आकांक्षा एन्टरप्रायजेस यांच्या प्राप्त दरास प्रशासनाने केलेल्या मंजुर रू.७३३/- प्रति मजुर प्रति दिन प्रमाणे दरास मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीमधील प्रभाग समिती कार्यालय १ ते ४ करीता नालेसफाई व रस्ते सफाई कामी बाह्ययंत्रणेमार्फत कामगार/मजुर उपलब्ध करून घेणेकामी दर निश्चीतीनुसार खाजगी संस्थेची नेमणूक करणे कामी दराची जाहीर ई - निविदा सुचना क्र.०१ सन २०२२-२३ (T.ID२०२२ ANMC-८०६४५१-१) मधील मे.आकांक्षा एन्टरप्रायजेस यांच्या प्राप्त दरास प्रशासनाने केलेल्या मंजुर रू.७३३/- प्रति मजुर प्रति दिन प्रमाणे दरास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजुर.खर्च मंजुर.

कायदेशीर व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.सचिन शिंदे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.रविंद्र बारस्कर सही/-

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपलिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : १०**

**विषय क्रमांक : १२२** **दिनांक :- २१/११/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका ढवणवस्ती परिसर,तपोवन हाडको,तपोवन परिसर,कसबे वस्ती परिसर ते नाना चौक पर्यत २०० एम.एम.व्यासाची HDPE पाईप लाईन टाकाणे कामाच्या दरास मंजुरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर:-** अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग

उपरोक्त विषयास अनुसरून विनंती रिपोर्ट सादर की,ढवणवस्ती परिसर,तपोवन हाडको,तपोवन परिसर,कसबे वस्ती परिसर ते नाना चौ पर्यत २०० एम.एम.व्यासाची HDPEपाईप लाईन टाकणे या कामाची व्दितीय फेर ई निविदा क्र.८३२६०५ दि.३०/०८/२०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती.

दि.१२/०९/२०२२ रोजी सदर निविदेचा स्क्रीन शॉट पाहिला असता त्या करिता २ निविदा प्राप्त झाले असून सदर निविदेचा तांत्रिक लिफाफा दि.१९/०९/२०२२ रोजी उघडला असता १) अंबादास चौधरी,अहमदनगर २)सुनिल राउत ,अहमदनगर या दोन निविदा प्राप्त झालेल्या होत्या.तांत्रिक कागदपत्रांची छाननी दि.२१/०९/२०२२ रोजी मा.छाननी समिती समोर केल्यानंतर आर्थिक लिफाफा उघडणेस शिफारस केली.त्या अनुंषंगाने निविदाधारक यांची निविदेचा दि.३०/०९/२०२२ रोजी आर्थिक लिफाफा उघडण्यात आला असता १) अंबादास चौधरी,अहमदनगर २)सुनिल राउत ,अहमदनगर यांचे दर खालील प्रमाणे प्राप्त झाले.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | निविदा रक्कम | प्राप्त दर |
|---|---|---|---|
| १ | अंबादास चौधरी,अहमदनगर | रू.३१,३१,१९९/- | २१%जादा दराने म्हणजेच रू.३७,८८,७५१/- |
| २ | सुनिल राउत ,अहमदनगर | रू.३१,३१,१९९/- | १८%जादा दराने म्हणजेच रू.३६,९४,८१५/- |

या अनुषंगाने विषयांकीत बाबतचे चालू दरसुची सन २०२१-२०२२ च्या दिनांक ०७/०३/२०२२ च्या सुधारित शुध्दीपत्रका नुसार अंदाजपत्रकीय रक्कम रू.३६,८०,४७९/- इतकी होत आहे.

कमीचे निविदाधारक सुनिल राउत ,अहमदनगर यांचे प्राप्त दरांची सदर अंदाजपत्रकाचे चालू दरसुची सन २०२१-२०२२ च्या दिनांक ०७/०३/२०२२ च्या शुध्दीपत्रका नुसार तुलना केली असता प्राप्त निविदा दर हे चालू दरसूचीच्या ०.३९% जादा म्हणजेच रू.१४,३३६/-इतके ने जादाचे आहेत.

कमीचे निविदाधारक सुनिल राउत ,अहमदनगर यांचे दर अंदाजपत्रकीय रक्कमेस करणे कामी त्यांचेशी वाटाघाटी करणे योग्य वाटते,मान्यतेस्तव तथा आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे शाखा अभियंता यांचा अहवाल असे.

यावर मा.जल अभियंता यांचा अभिप्राय की,मान्यतेस्तव सादर.

यार मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,Coll For Negotation

संबंधीत ठेकेदार करसुची २०२१-२०२२ व सुधारणा दि.७/३/२०२२ च्या दराप्रमाणे करणेस तयार आहे.परंतु मुळ दरसुची नुसार करणेस तयार नाही.

चालु दरसुची नुसार करणेस मान्यतेस सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,मान्य,मा.स्थायी समितीकडे सदर करणेत यावे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका ढवणवस्ती परिसर,तपोवन हाडको,तपोवन परिसर,कसबे वस्ती परिसर ते नाना चौक पर्यत २०० एम.एम.व्यासाची HDPE पाईप लाईन टाकाणे कामाच्या दरास मंजुरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.रविंद्र बारस्कर :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.सभापती साहेब :- हा विषय या पुर्वी सुध्दा सभेपुढे आला होता.पुन्हा का आला.

मेकॅनिकल इंजी.श्री.निकम :- दिनांक १८/०४/२०२२ रोजीच्या सभेमध्ये विषय घेण्यात आलेला होता.विभागाने सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने वाढीव रक्कम देणे बाबत विषय होता.वाढीव रक्कम देता येत नसल्याने पुन्हा नव्याने पुर्ण विषय सादर करण्यात आलेला आहे.

मा.श्री.समद खान :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.श्री.रविंद्र बारस्कर :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका ढवणवस्ती परिसर,तपोवन हाडको,तपोवन परिसर,कसबे वस्ती परिसर ते नाना चौक पर्यत २०० एम.एम.व्यासाची HDPE पाईप लाईन टाकाणे करीता चालु दरसुची नुसार निविदाधारक सुनिल राउत ,अहमदनगर यांचे दरास मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका ढवणवस्ती परिसर,तपोवन हाडको,तपोवन परिसर,कसबे वस्ती परिसर ते नाना चौक पर्यत २०० एम.एम.व्यासाची HDPE पाईप लाईन टाकाणे करीता चालु दरसुची नुसार निविदाधारक सुनिल राउत ,अहमदनगर यांचे दरास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोट्र मंजुर.खर्च मंजुर.

कायदेशीर व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.समद खान सही/-

अनुमोदक :- मा.श्री.रविंद्र बारस्कर सही/-

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका